मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | बुधवार, ३० एप्रिल २०२५ | वर्ष: ६ | अंक:१३२ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## अंध मुलाने क्रॅक केली यूपीएससी

**नवादा, दि. २९ प्रतिनिधी**

यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२४चा अंतिम निकाल २२ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला. एकूण १००९ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. उतीर्ण झालेल्या अनेक उमेदवारांची सध्या सोशल मीडिया आणि माध्यमांमध्ये चर्चा सुरू आहे. आज आम्ही तुम्हाला अशा उमेदवाराबद्दल सांगणार आहोत, ज्याने या परीक्षेत १८२ वा क्रमांक मिळवून आयएएस पदाला गवसणी घातली. विशेष म्हणजे, हा उमेदवार पाहू शकत नाही. आपल्या व्यंगावर मात करत त्याने देशातील सर्वात कठीण परीक्षा उतीर्ण केली आहे. बिहारच्या नवादा जिल्ह्यातील रहिवासी रवी राज याने आपले संपूर्ण शिक्षण नवादा येथून पूर्ण केले. त्याला लहानपणापासून अभ्यासाची आवड होती. दहावीत असताना एका आजारामुळे त्याची दृष्टी पूर्णपणे गेली. पण, रवीने कधीच या अंधत्वाला आपल्या यशाच्या वाटेत येऊ दिले नाही. पदवीनंतर त्याने यूपीएससीची तयारी सुरू केली अन् चौथ्या प्रयत्नात यश मिळवले.

### अग्राग्रलेख
### खरीखरी

## पिकविमा योजनेची पिक-पिक

सध्याच्या काळात शेतकरी सरकारकडून बरीच आशा लावून बसलेले होते. परंतु आपल्या सरकारची आर्थिक परिस्थिती सध्या तरी कोणताही नवा खर्च वहन करण्याएवढी म्हणजेच उचलण्याएवढी मजबूत नाही. आजच्या कालावधीमध्ये प्रत्येक राज्य सरकारला उत्पन्नाची साधने कमी आणि खर्चाच्या योजना जास्त अशीच अवस्था आहे. प्रत्येक राज्य सरकार निवडणूक आली रे आली की, धडाधड घोषणांचा वर्षाव करीत असते. या घोषणांमुळे जनतेचे पोषण होते की नाही. हा वादाचा मुद्दा आहे. पण सरकारचे मात्र शोषण होते, ही खरी गोष्ट आहे. आता पिक विमा योजनेचीच गोष्ट घ्या. पिक विमा योजना शेतकऱ्यांच्या किती फायद्याची, तोट्याची आहे आणि विमा कंपन्यांच्या किती फायद्याची आहे. याचा अहवाल नुकताच आलेला आहे. यावर्षी पिक विमा योजनेचे लाभार्थी जे कोणी होते. त्यांना त्याचा लाभ मिळालाच नाही. कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वर अस्मानी आणि सुल्तानी आपत्त्या येणे. हे आता अगदी स्पष्ट आणि नित्याचे झालेले आहे. कधी कमी पावसाने आपत्ती येते. तर कधी अवकाळी पावसाने आपत्ती निर्माण होते. एकूण काय तर सरते शेवटी नुकसान हा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. शेतकऱ्यांना एक रुपयात पिक विमा योजना मिळाली. पण त्यासाठी त्या पिक विम्याचे हप्ते सरकारने भरले. हे सर्वांना ठाऊक आहे. आता ही योजना पुन्हा चालू ठेवायची. तर एक रुपयाएवजी थोडी जास्त रक्कम भरून शेतकऱ्यांना ही योजना लागू करण्याचे मनसुबे चालू आहेत. या गोंधळात शेतकऱ्यांचा आणि त्यासोबत सरकारचा पैसा जातो. पण नुकसान झाल्यास अपेक्षित असलेली मदत शेतकऱ्यांना देताना विमा कंपन्या आपला हात आखडता घेतात. त्यामुळे सरकारने कितीही कडक धोरण स्वीकारले. तरी त्यातून खुष्कीचा कसा मार्ग काढायचा. हे विमा देणाऱ्या कंपन्यांना ठाऊक आहे. अशा स्थितीत ही योजना सुरू करायची असेल. तर त्याचे निकष सरकारने ठरवावे. ते नवीन निकष विमा कंपन्यांनी मान्य करावे आणि त्याबरहुकूम वागावे. तर आणि तरच शेतकऱ्यांना फायदा होऊ शकेल. हे काम फार अवघड आहे. मात्र अशक्य नाही. सरकारने जरा कडक धोरण स्वीकारले आणि विमा कंपन्यांची दादागिरी झुगारून दिली. तर शेतकरी सरकारला मनापासून किंबहुना अंत:करणापासून दुवाच देतील. आधीच कर्जमाफीच्या आशेवर शेतकऱ्यांच्या बोडक्यावर कर्ज व त्यांचे व्याज बसलेले आहे. लाडक्या बहिणींचा दरमहाचा हप्ता पंधराशे रुपयांवरून २१०० रुपये होणार होता. तसे खुद्द तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी म्हटलेले होते. पण आता न्यायासाठी सहाव्या मजल्यावरून थेट जवळच असलेल्या संरक्षक जाळीला हिरवळ समजून उडी मारणाऱ्या आपल्या मंत्री महोदय झिरवळ साहेबांनी असे आश्वासन कोणीच दिले नव्हते. असे ठामपणे सांगितलेले आहे. अन्यायाविरुद्ध लढणारे त्यासाठी उडी मारणारे झिरवळ आता सरकारचा बचाव करीत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विनाकारणाच्या म्हणजेच गरज नसताना केलेल्या खर्चाला आळा घालण्याकरता कडक उपाय योजलेले आहेत. अनेक ठिकाणी खर्च कपातीला प्रभावी अटकाव करणाऱ्या उपाययोजना आखलेल्या आहेत. तेव्हा आता हे शेतकऱ्यांच्या मदतीसाठी किमान पिक विमा योजनेचे तरी फायदे मिळावेत. यासाठी मुख्यमंत्र्यांनी ठोस निर्णय घेऊन शेतकरी बांधवांना दिलासा दिला पाहिजे. अन्यथा पिक विमा योजनेची पिक-पिक शेतकऱ्यांना कधीच फायद्याची ठरणार नाही, एवढे मात्र खरे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# देशाच्या सुरक्षेचा विषय असेल तर हेरगिरी करण्यात काय अडचण ?

## पेगाससवरुन सुप्रीम कोर्टाचा सवाल



**नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था**

इस्रायली कंपनी एनएसओ ग्रुपने तयार केलेल्या पेगासस स्पायवेअर बरेच चर्चेत आले होते. पेगासस स्पायवेअर वापरुन हेरगिरी करण्यात येत होती. भारतात या स्पायवेअरचा वापर करून केंद्र सरकार विरोधकांवर पाळत ठेवत असल्याचा आरोप करण्यात आला होता. मोदी सरकारने विरोधकांवर पाळत ठेवण्यासाठी पेगासस स्पायवेअर वापरून त्यांचा मोबाइल हॅक करण्याचा प्रयत्न केल्याचा दावा केला होता. त्यानंतर सुप्रीम कोर्टातही हे प्रकरण पोहोचलं होतं. याप्रकरणी आता सुप्रीम कोर्टाने महत्त्वाची टिप्पणी केली आहे. देशाच्या सुरक्षेशी तडजोड करता येणार नाही, असे सुप्रीम कोर्टाने म्हटलेले आहे.

पेगासस तपासाशी संबंधित अहवाल सार्वजनिक करण्याच्या मागणीवरील सुनावणीदरम्यान सुप्रीम कोर्टाने महत्त्वाचे विधान केले आहे. "संपूर्ण अहवाल सार्वजनिक करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या अहवालाला रस्त्यावर चर्चा करता येईल अशी कागदपत्रे बनवता येणार नाही. जर हा राष्ट्रीय सुरक्षेचा विषय असेल तर अशा हेरगिरीत काय अडचण आहे. न्यायालय प्रभावित सामान्य नागरिकांबद्दल विचार करू शकते. अशा प्रभावित लोकांच्या मागण्या आपण विचारात घेऊ शकतो," असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं.

मंगळवारी पेगासस प्रकरणातील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले की जर सरकार दहशतवाद्यांवर हेरगिरी करत असेल तर त्यात काय चूक आहे? त्याच वेळी, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की ते असा कोणताही अहवाल सार्वजनिक करणार नाहीत जो देशाच्या सुरक्षेशी आणि सार्वभौमत्वाशी संबंधित असेल. सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले की ते असा कोणताही अहवाल सार्वजनिक करणार नाहीत जो देशाच्या सुरक्षेशी आणि सार्वभौमत्वाशी संबंधित असेल. तथापि, त्यांनी असे सूचित केले की ते गोपनीयतेच्या उल्लंघनाच्या वैयक्तिक आशंकेचा विचार करू शकतात. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने सांगितले की तांत्रिक समितीच्या अहवालावर रस्त्यावर चर्चा करू नये.

याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित असलेले वकील दिनेश द्विवेदी यांनी सुनावणीदरम्यान सांगितले की 'प्रश्न असा होता की सरकारकडे स्पायवेअर सॉफ्टवेअर आहे का आणि ते ते वापरू शकते का? जर सरकारकडे ते असेल तर त्यांना ते वापरण्यापासून कोणीही रोखू शकत नाही.' यावर खंडपीठाने म्हटले की 'जर देश दहशतवाद्यांवर स्पायवेअर वापरत असेल तर त्यात काय चूक आहे? स्पायवेअर असणे चुकीचे नाही, प्रश्न हा आहे की ते कोणाविरुद्ध वापरले जात आहे. देशाच्या सुरक्षेशी तडजोड करता येणार नाही. सामान्य नागरिकांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे संविधानानुसार संरक्षण केले जाईल. खंडपीठाने म्हटले आहे की 'देशाच्या सुरक्षेशी आणि सार्वभौमत्वाशी संबंधित असलेल्या कोणत्याही अहवालाला हात लावला जाणार नाही, परंतु जर एखाद्याला वैयक्तिकरित्या जाणून घ्यायचे असेल की त्याचा अहवालात समावेश आहे की नाही, तर त्याला त्याबद्दल माहिती दिली जाऊ शकते. परंतु अहवालाला असे दस्तएवज बनवले जाणार नाही की रस्त्यावर त्याची चर्चा होईल. तांत्रिक समितीचा अहवाल संबंधित व्यक्तीसोबत किती प्रमाणात शेअर करता येईल याची चौकशी ते करतील असे न्यायालयाने म्हटले आहे. यानंतर, खंडपीठाने या प्रकरणावरील सुनावणी ३० जुलैपर्यंत तहकूब केली. पेगासस हे एक इस्रायली सॉफ्टवेअर आहे ज्याचा वापर मोबाईल फोन हॅक करण्यासाठी आणि त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी केला जातो. २०२१ मध्ये अनेक माध्यमांच्या वृत्तांतात दावा करण्यात आला होता की भारतातील अनेक पत्रकार, राजकारणी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे फोन हेरण्यात आले होते. यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याचे आदेश दिले. २०२१ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने पेगासस प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक तांत्रिक समिती आणि एक देखरेख समिती स्थापन केली होती.

## पहलगाम हल्ल्यात मृतांच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत

### राज्य सरकारचा निर्णय



**मृत पर्यटकांमध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश होता.**
हेमंत सतीश जोशी – ठाणे(महाराष्ट्र)
अतुल श्रीकांत मोने – मुंबई(महाराष्ट्र)
संजय लक्ष्मण लेले - ठाणे(महाराष्ट्र)
दिलीप देसले – पनवेल(महाराष्ट्र)
संतोष जगदाळे – पुणे(महाराष्ट्र)
कौस्तुभ गणबोटे – पुणे(महाराष्ट्र)

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीर येथील पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निरपराध नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांमध्ये सहा जण महाराष्ट्रातील होते. कुटुंबातील कर्त्याधर्त्या व्यक्तींच्या मृत्यूने या कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला. या पार्श्वभूमीवर सदर कुटुंबांना आर्थिक मदत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून पीडित कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची मदत करण्यात येणार आहे. याबाबतचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

पहलगाम इथं क्रूर दहशतवाद्यांना धर्म विचारून निष्पाप नागरिकांवर गोळीबार करत त्यांचा जीव घेतला. या हल्ल्याने देशभर संताप व्यक्त केला जात असून हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांप्रती सहानुभूती व्यक्त केली जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना आधार दिला होता. तसंच या कुटुंबांना आर्थिक मदत आणि सरकारी नोकरीबाबतचं आश्वासन मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आलं होतं. त्यानुसार आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपयांची मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसंच मृत संतोष जगदाळे यांच्या मुलीला सरकारी नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## महाराष्ट्राचे तीन कंपन्यांशी ५७ हजार कोटींचे करार; नऊ हजार नवे रोजगार

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

महाराष्ट्रासाठी एक चांगली बातमी समोर आली आहे. राज्याच्या जलसंपदा विभागाचे तीन कंपन्यांसोबत एकूण नऊ मोठे करार झाले आहेत. या कंपन्यांच्या माध्यमातून आता महाराष्ट्रात कोट्यवधींची गुंतवणूक केली जाणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राज्याच्या जलसंपदा विभागाने एकूण तीन कंपन्यांसोबत नऊ करार केले आहेत. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. या नऊ करारांमुळे राज्यात ८ हजार ९०५ मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. कारारातून एकूण ५७ हजार ७६० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे.

विशेष म्हणजे तीन कंपन्यांसोबत केलेल्या या करारातून महाराष्ट्रात साधारण ९ हजार २०० नवे रोजगार निर्माण होणार आहेत. महाजेनको, एमआरईएल, आवादा या तीन कंपन्यांसोबत हे करार झाले आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्रात अशा प्रकारचे मोठे आणि नव्याने रोजगारनिर्मिती करणारे करार झाले नव्हते. आता मात्र तीन नामांकित कंपन्यांसोबत कोट्यवधी रुपयांचे ९ करार झाल्यामुळे भविष्यात आणखी काही चांगले करार अन्य कंपन्यांशी होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी सरकार प्रयत्नशील**

राज्यात उद्योगधंदे वाढीस लागावेत म्हणून गेल्या काही वर्षांपासून राज्य सरकारकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. उद्योगांसाठी लागणाऱ्या वीज, रस्ते, जमीन, पाणी तसेच इतर महत्त्वाच्या सुविधांची निर्मिती करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. विशेष म्हणजे या पायाभूत सुविधा किफायतशीर दरात पुरवण्याचेही सरकार आश्वासन देते. राज्यात उद्योगधंद्यांच्या भरभराटीमुळे नव्या रोजगारांची निर्मिती व्हावी, यासाठी सरकारचे प्रयत्न चालू आहेत.

## भारताने पाकिस्तानला संयुक्त राष्ट्रात खडसावले

**न्यूयॉर्क, दि. २९ वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यावरून जगभरात पाकिस्तानला लक्ष्य केलं जात आहे. भारतातून या हल्ल्यानंतर संतप्त प्रतिक्रिया उमटत असून पाकिस्तानला धडा शिकवण्याची मागणी भारतीयांकडून केली जात आहे. काश्मीरच्या खोऱ्यात भारतीय तपास पथकांनी दहशतवाद्यांचा माग काढण्यासाठी मोहीम तीव्र केली आहे. सीमेवरदेखील वातावरण तणावपूर्ण झालं असून पाकिस्तानकडून वारंवार शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं जात आहे. या पार्श्वभूमीवर भारतानं संयुक्त राष्ट्राच्या बैठकीमध्ये पाकिस्तानला कठोर शब्दांत सुनावलं आहे.



संयुक्त राष्ट्रातील भारताच्या प्रतिनिधी योजना पटेल यांनी व्हिक्टिम्स ऑफ टेररिजम असोसिएशन नेटवर्क अर्थात VoTAN या संयुक्त राष्ट्राच्या उपक्रमासंदर्भातील बैठकीत पाकिस्तानला फैलावर घेतलं. “एका देशाच्या शिष्टमंडळानं या व्यासपीठाचा गैरवापर भारताविरुद्ध निराधार आरोप करून अपप्रचार पसरवण्यासाठी करणं हे दुर्दैवी आहे”, असं म्हणत त्यांनी पाकिस्तानवर तोफ डागली.

योजना पटेल यांनी यावेळी पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी नुकत्याच केलेल्या एका जाहीर विधानाचा संदर्भ घेत पाकिस्तानला सुनावलं. “पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी ‘दहशतवादी संघटनांना पाठिंबा देण्याचा, प्रशिक्षण देण्याचा आणि दहशतवादी कारवायांना आर्थिक पाठबळ देण्याचा पाकिस्तानचा इतिहास राहिला आहे’, असं जाहीर मुलाखतीमध्ये मान्य केलं आहे. ख्वाजा आसिफ यांची ही जाहीर कबुली एकून कुणालाही आश्चर्य वाटलं नाही. यातून पाकिस्तान जागतिक दहशतवादाला खतपाणी घालणारा आणि भारतीय उपखंडात अस्थैर्य निर्माण करणारा देश सिद्ध झाला आहे. जग याकडे आता दुर्लक्ष करू शकत नाही”, असं योजना पटेल म्हणाल्या.

दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर भारताला पाठिंबा देणाऱ्या जगभरातल्या देशांचे यावेळी योजना पटेल यांनी आभार मानले. “आंतरराष्ट्रीय समुदायाची दहशतवादासंदर्भातली कठोर भूमिका यातून स्पष्ट होतेय. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये २६/११ च्या मुंबई हल्ल्यानंतर सर्वाधिक संख्येनं सामान्य नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत. गेल्या अनेक दशकांपासून भारत सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी कारवायांचा बळी ठरला आहे. त्यामुळे अशा कारवायांनंतर मृतांच्या कुटुंबीयांवर व समाजावर होणाऱ्या दूरगामी परिणामांची भारताला पूर्ण कल्पना आहे”, असंही योजना पटेल यांनी नमूद केलं.

“संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दहशतवादी, अशा कारवायांचे नियोजनकर्ते, या कारवायांना आर्थिक मदत करणारे आणि अशा कारवायांचे कर्तेधर्ते यांना दोषी मानून त्यांना शासन व्हायला हवं. दहशतवादी कृत्ये ही गुन्हेगारी स्वरूपाची व असमर्थनीय असतात. मग त्यामागे त्यांचा उद्देश काहीही असो किंवा ती कधीही, कुठेही आणि कुणीही केलेली असोत”, असंही पटेल यांनी यावेळी स्पष्ट केलं.

## काश्मीरच्या बडगाममध्ये सीआरपीएफच्या वाहनाचा अपघात

### अनेक जवान जखमी

**बडगाम, दि. २९ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील मध्य काश्मीरमधील बडगामच्या खानसाहिब तहसीलमधील तंगनार भागात सीआरपीएफच्या वाहनाला भीषण अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, वाहन रस्त्यावरुन घसरले अन् खोल खड्डयात पडले. मिळालेल्या माहितीनुसार, चालकाचे अचानक गाडीवरील नियंत्रण सुटले अन् गाडी खोल खड्डयात पडली. या घटनेत विशेष क्यूएटी दक्षिण श्रीनगर रेंजचे सुमारे दहा सैनिक जखमी झाले असून, त्यापैकी २ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. सर्व जखमींना श्रीनगर येथील आर्मी बेस हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, या अपघातात अनेक सीआरपीएफ जवान जखमी झाले आहेत. घटनेनंतर लगेचच बचाव कार्य सुरू करण्यात आले.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत मल्लिकार्जुन खरगेंचे मोदींना पत्र



**नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट पसरली आहे. अनेक देशांनी भारताला दहशवादविरोधी पाठींबा दर्शवला आहे. दरम्यान भारतातील विरोधी पक्षांनी देखील पीएम मोदी यांना दहशतवादविरोधी पाठिंबा दिला आहे. दरम्यान काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदींना याबाबत पत्र लिहिले आहे.

काँग्रेस अधयक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रामध्ये म्हटले आहे की, "सध्या आपल्यातील एकता आणि एक्य फार आवश्यक आहे. या महत्त्वाच्या वेळी, भारताने हे दाखवून दिले पाहिजे की आपण दहशतवादाविरुद्ध नेहमीच एक आहोत. या काळात विरोधकांना वाटते की, संसदेत दोन्ही सभागृहांचे विशेष अधिवेशन तातडीने बोलावणे महत्त्वाचे आहे. ही आपल्या सामूहिक निर्धाराची आणि इच्छाशक्तीची ठोस अभिव्यक्ती असेल. जी २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे निरपराध नागरिकांवर झालेल्या निर्घृण दहशतवादी हल्ल्याचा सामना करण्यासाठी आवश्यक आहे. आम्हाला ही आशा आहे की, हे अधिवेशन लवकरात लवकर बोलावले जाईल".

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर सर्वपक्षीय बैठक झाली. दरम्यान विरोधकांनी केंद्र सरकारला थेट आणि कठोर प्रश्न विचारले. बैठकीत विरोधकांचा मुख्य रोख हल्ला ज्या बैसरण या पर्यटकांसाठी प्रसिद्ध असलेल्या जागी झाला, त्या ठिकाणी सुरक्षादलांची उपस्थिती का नव्हती यावर होता. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हा मुद्दा उपस्थित केला, आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंग यांच्यासह अनेकांनी त्याला पाठिंबा दिला.

## कॅनडात पुन्हा मार्क कार्नी सरकार

### भारताशी संबंध सुधारण्याचे संकेत



**ओटावा, दि. २९ वृत्तसंस्था**

सोमवारी कॅनडामध्ये सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदान पार पडलं. मंगळवारी ३४३ जागांसाठी झालेल्या मतांची मोजणी करण्यात आली. मंगळवारी सकाळी मतमोजणीला सुरुवात झाली. दुपारपर्यंत कॅनडाची सूत्र पुन्हा एकदा मार्क कार्नी यांच्याकडेच जाणार असल्याचं स्पष्ट झालं आणि लिबरल पक्षानं एकच जल्लोष केला. दुसरीकडे कन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे उमेदवार पिएर्रे पॉलिव्हरे यांचा या निवडणुकीत मोठा पराभव झाला. विशेष म्हणजे या निवडणुकीत १७ पंजाबी व्यक्ती निवडून आल्या आहेत. तर खलिस्तानी समर्थक जगमीत सिंह बर्नबी यांचा या निवडणुकीत पराभव झाला आहे. मार्क कार्नी यांच्या धोरणांनुसार कॅनडाशी गेल्या काही वर्षांत ताणले गेलेले भारताचे द्विपक्षीय संबंध सुधारण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या टॅरिफ वॉरच्या पडछायेत कॅनडामध्ये या निवडणुका पार पडल्या. या पार्श्वभूमीवर निवडून आल्यानंतर केलेल्या भाषणात मार्क कार्नी यांनी अमेरिकेच्या या धोरणावर टीकास्त्र सोडलं. “या फक्त पोकळ धमक्या नाहीत. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे आपल्याल पूर्णपणे उद्ध्वस्त करू इच्छितात, जेणेकरून अमेरिकेला आपला ताबा घेता येईल. पण ते कधीच शक्य होणार नाही”, असं मार्क कार्नी म्हणाले.

**खलिस्तानवादी जगमीत सिंग पराभूत**



कॅनडाच्या न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचे (एनडीपी) नेते आणि खुलेपणाने खलिस्तानी विचारसरणीला समर्थन देणारे जगमीत सिंग याचा फेडरल निवडणुकीत मोठा पराभव झाला आहे. त्यांच्या या पराभवामुळे भारत-कॅनडा संबंधांमध्ये नव्याने स्थिरता येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जगमीत सिंग यांनी सतत, कोणताही पुरावा न देता, भारत सरकारच्या एजंटांनी खलिस्तानी अतिरेकी हर्दीपसिंग निज्जर यांच्या हत्येत सहभाग असल्याचा आरोप केला होता. त्यांना स्वतःच्या मतदारसंघात-ब्रिटीश कोलंबियातील बर्नाबी सेंट्रलमध्ये लिबरल पार्टीच्या वेड चँग यांनी पराभूत केले. त्यांची एनडीपी पार्टी, जी या निवडणुकीत ‘किंगमेकर’ ठरू शकते, अशी शक्यता वर्तवली जात होती, ती देखील चौथ्या स्थानी फेकली गेली.

## राज्यात नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरण

### टोल नाक्यावर सूट देणार

### सुधारित पीक विमा लागू करणार; राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय

**गजानन तुपे**

**मुंबई, दि. २९**

राज्यात यापुढे सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्येही आणि टोलमध्येही सूट देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच राज्यातील जहाज निर्मितीलाही प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळात घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळामध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची माहिती दिली.

राज्य सरकारने एक नव्या इलेक्ट्रिक व्हेईकल पॉलिसीचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये चार्जिंग स्टेशन्सची सुविधा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रिक व्हेईकल्सच्या खरेदीवर सबसिडी आणि काही प्रमाणात टोलवरही सूट देण्यात येणार आहे.

शिप ब्रेकिंग, शिप बिल्डिंग वाढवण्यात येणार आहे. त्यातून रोजगार निर्मिती होते. राज्यात तीन मोठे बंदर आहेत. त्यातून व्यवसाय निर्माण होऊ शकते. त्या मुद्द्यावर एक पॉलिसी करण्यात आली आहे.

**सुधारित पीक विमा योजना लागू करणार**

राज्यात सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. १ रुपयात विमा योजनेत लाखो बोगस अर्ज आले. लोकांनी निधीचा अपव्यय करणारे षड्यंत्र केले. त्यामुळे गरजू व्यक्ती या योजनेपासून वंचित राहू नये म्हणून सुधारित योजना आणणार आहे. विमा कंपन्यांचा नव्हे तर शेतकऱ्यांचा लाभ व्हायला हवा.

**इतर महत्त्वाचे निर्णय**

- टेमघर प्रकल्प, ता. मुळशी, जि. पुणे येथील उर्वरित कामे व धरण गळती प्रतिबंधक कामासाठी रु.४८८.५३ कोटी किमतीच्या सुधारित खर्चाला प्रशासकीय मान्यता.
- मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ अंतर्गत महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध नियम, १९६४ मधील नियम २७(ब) (३) मधील तरतूदीमध्ये सुधारणा. भिक्षागृहातील व्यक्तींना ५ रुपये एवजी आता ४० रुपये प्रतिदिन.
- PM-YASASVI या एकछत्री योजनेअंतर्गत ओ.बी.सी., ई.बी.सी. व डी.एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२१-२२ ते २०२५-२६ या वर्षांकरिता निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याचा निर्णय.
- हडपसर ते यवत राज्य मार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग व अस्तित्वातील रस्त्याचे सहापदरी बांधकाम करण्यास मान्यता.
- सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत महा इनविट (पायाभूत सुविधा गुंतवणूक संस्था) स्थापन करण्यास मान्यता.
- महाराष्ट्र राज्यात जहाजबांधणी व जहाजदुरुस्ती सुविधा आणि जहाज पुनर्वापर सुविधा विकसित करण्याबाबतच्या धोरणास मान्यता.
- महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२५ ला मान्यता.
- अॅप बेस वाहनांसाठी समुच्चयक धोरण.
- सर्वसमावेशक पीकविमा योजनेत बदल करून केंद्र सरकारच्या अनिवार्य जोखीम बाबीवर आधारित पीकविमा योजना राबवणार तसेच कृषि क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषि पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी योजना राबविणार
- आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजबांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याचा निर्णय
- म. रा. इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाख रुपयांवरून १५ लाख रुपये करण्याचा निर्णय

## खून का बदला खून!

## नाशिकमधील अल्पवयीन मुलाच्या हत्या प्रकरणाचा उलगडा

**नाशिक, दि. २९ प्रतिनिधी**

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कामटवाडे परिसरात करण उमेश चौरे (वय १७) या युवकाची सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास पाच ते सहा जणांच्या टोळक्याने डोक्यात दगड व फर्शी घालून निघृण हत्या करण्यात आली होती. जुन्या वादातूनच ही हत्या झाली असल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात होता. गुन्हे शोध पथकाच्या युनिट-१ ने याप्रकरणी दोन विधी संघर्षित बालकांसह तिघांना ताब्यात घेतले होते. आता आरोपींच्या चौकशीत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.



मयत करण चौरे याच्यावर गंगापूर हद्दीतील अरुण बंडी याच्या खुनाच्या गुन्ह्यात सामील असल्याचा संशय होता. त्यामुळे त्याला बालसुधारगृहात ठेवण्यात आले होते. आठवडाभरापूर्वी तो सुधारगृहातून बाहेर आला होता. स्वतःच्या जीवाला धोका असल्याची माहिती त्याने आपल्या पालकांना दिली होती. त्यामुळे तो सिडकोतील कामटवाडे येथे एका मित्राकडे राहायला गेला होता.

सोमवारी दुपारच्या दरम्यान स्मशानभूमी रोडने जात असताना पाच ते सहा संशयितांनी त्याचा पाठलाग करत रस्त्यात अडवून बेदम मारहाण केली. या हल्ल्यात त्याच्या डोक्यात दगड व फर्शी मारण्यात आल्याने गंभीर इजा होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला होता. यानंतर बंडीच्या खुनाचा बदला घेतला, असे काही जण म्हणत होते तर काही जण खून का बदला खून म्हणत होते. सर्व संशयीत जल्लोष करत घटनास्थळावरुन फरार झाले होते.

यानंतर अंबड पोलीसांसह परिमंडळ-२ च्या पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी घटनास्थळी पाहणी केली. अंबड पोलिसांनी आकाश चौरे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात पाच ते सहा संशयितांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दोन विधी संघर्षित बालकांसह तिघांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. संत कबीरनगरातील अरुण बंडीच्या खुनाचा बदला घेण्यासाठी चिमण्या उर्फ महेश सोनवणे आणि सुमित बगाटे यांच्यासह अन्य साथीदारांनी कामटवाड्यात करणवर हल्ला केला. यामध्ये त्याच्या डोक्यात दगड घालून त्याला ठार करण्यात आले, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली आहे.

## पंतप्रधान मोदी आज घेणार चार महत्त्वाच्या बैठका

**नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था**

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला आज आठवडा उलटला आहे. या घटनेनंतर देशभरातून संतापाची लाट व्यक्त होत आहे. तसेच दहशतवादी आणि त्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना धडा शिकवण्याचा निर्धार केला आहे. स्वत: मोदी सुरक्षा दलांकडून याबाबत खडानखडा माहिती मिळवत आहेत. तसेच आता पुढे काय कारवाई करायची याची आखणी करण्यासाठी केंद्र सरकार बुधवारी महत्त्वपूर्ण बैठका घेणार आहे. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी एकापाठोपाठ एक चार बैठका घेणार असून, त्यात काही मोठे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बुधवारचा दिवस निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. बुधवारी सकाळी ११ वाजता सर्वप्रथम कॅबिनेट सुरक्षा समितीची बैठक बोलावण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. या बैठकीत संरक्षणविषयक तयारीवर चर्चा होण्याची शक्यता आहे. पहलगाममधील हल्ल्यानंतर आठवडाभरात दुसऱ्यांदा या समितीची बैठक होणार आहे.

या बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली सीसीपीएची बैठक होईल. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, वित्तमंत्री निर्मला सीतारमन, केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी, सर्वानंत सोनोवाल आदी मंत्री सहभागी होतील.

त्यानंतर बुधवारी होणारी तिसरी मोठी बैठक ही कॅबिनेटच्या आर्थिक विषयक समितीची असेल. त्यानंतर कॅबिनेटची बैठक होईल. पहलगाममधील हल्ल्यानंतर होणारी ही कॅबिनेटची पहिलीची बैठक असेल. या बैठकीत संरक्षण विषयक तयारीचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर इतर विषयांवर चर्चा होईल. त्यानंतर पुढील रणनीतीबाबत काही मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे.

इतर आवृत्त्या : पालघर- ठाणे, नाशिक, नागपूर, अकोला, अमरावती, खामगाव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर महासागर

## महत्त्वाचे

### मंगल कलश यात्रेचे आज सिन्नरमध्ये आगमन

**सिन्नर ।** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संपूर्ण महाराष्ट्रात मंगल कलश यात्रा हा अभिनव उपक्रम सुरू केलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सहा विभागीय स्तरावर महाराष्ट्र गौरव मंगल कलश यात्रा काढल्या जात आहेत. ही रथयात्रा महाराष्ट्रभर घोडदौड करीत असताना बुधवार दिनांक 30 एप्रिल 2025 रोजी ती सिन्नर मध्ये येत असून महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकरावजी कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रथयात्रा सिन्नर मधून जात आहे. सिन्नर मधील तमाम राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी तसेच महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री कोकाटे यांच्या आवाहनास प्रतिसाद देण्यासाठी व रथयात्रेचे भव्य स्वागत करण्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रथयात्रा स्वागत समितीचे अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले यांनी केले आहे. तसेच सिन्नर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर प्रमुख सुभाष कुंभार, तालुका प्रमुख संतोष कदम, महिला तालुकाध्यक्ष मंगला कुऱ्हाडे, शहराध्यक्ष मनीषा माळी, सिन्नर नगर परिषदेचे आजी-माजी सर्व नगरसेवक या यात्रेत सहभागी होणार असून महिलांची देखील मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहणार आहे. स्वागत कमिटीच्या वतीने सर्वांना विनंती करण्यात येत आहे की सर्वांनी बुधवारी आडवा फाटा ते बस स्टॅन्डपर्यंत सकाळी आठ वाजता मंगल कलश यात्रेचे स्वागत करण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन मल्लू पाबळे, बुभूष देशमुख यांनी केले आहे.

### मंथन सामान्यज्ञान परीक्षेत येवला होरायझनचा डंका

**नाशिक ।** राज्यस्तरीय मंथन सामान्यज्ञान परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून, यात मविप्रच्या येवला येथील होरायझन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. शिवतेज शिंदे याचा राज्य पातळीवर ४ था क्रमांक तर गार्गी लोखंडे ही राज्य पातळीवर ९ व्या रँकने उत्तीर्ण झाली. कार्तिकी घुले, अद्वय भावसार, शिवम बडदे, सिया लोणारी, अभिनंदन गायके, आर्यन पिंपळे, सोजस मोरे, अद्विका जोंधळे, मृणालिनी काळे, अपूर्व काकडे, अभिज्ञा काळे, विराज गुंजाळ, शिवप्रिया शिंदे या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत नेत्रदीपक अशी कामगिरी केली. त्यांच्या या यशासाठी संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर, शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे, मुख्याध्यापिका सुनिता हिंगडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### एमव्हीपी टॅलेंट सर्च स्पर्धा; ३३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या वतीने आयोजित 'एमव्हीपी टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षा २०२४-२५'मध्ये वाघ गुरुजी बाल शिक्षण मंदिर शाळेतील ३३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र संस्थेचे संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, स्कूल कमिटीचे अध्यक्ष दत्तात्रेय कोशिरे, सदस्य हिरामण सोनवणे, छबू पवार, मंगल हिरे, मनीषा अहिरराव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपशिक्षक वैभव पिंगळे यांनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. मुख्याध्यापिका पुष्पा लांडगे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर मुख्याध्यापिका लांडगे यांनी विद्यार्थ्यांना प्रास्ताविकातून स्पर्धा परीक्षेचे महत्त्व सांगितले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे व स्कूल कमिटीचे अध्यक्ष दत्तात्रेय कोशिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ज्येष्ठशिक्षिका पौर्णिमा पगार यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ शिक्षिका कल्पना पाटील यांनी आभार मानले.

### कृषी महाविद्यालयात पदवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**नाशिक ।** विद्यार्थ्यांनी गेल्या चार वर्षांत महाविद्यालयात घेतलेले शिक्षण आणि अनुभवाचा फायदा आपल्या शेतकऱ्यांना, कृषी क्षेत्राला आणि पर्यायाने देशविकासाला हातभार लावण्यासाठी कसा होईल, याकडे लक्ष द्यावे. स्वतःच्या जीवनाचे पुस्तक भविष्यात स्वतःच्या कर्तृत्वाने लिहिले गेले पाहिजे, असे काम करा. जिद्द व चिकाटी असेल तर यशाची शिखरे गाठणे अवघड नाही, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब द. भाकरे यांनी केले. भावी आयुष्यात येणाऱ्या आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी अनुभवाचे बोल सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना जागतिक पुस्तक दिनाच्या शुभेच्छाही दिल्या. मराठा विद्या प्रसारक समाज संचलित कर्मयोगी दुलाजी सीताराम पाटील कृषी महाविद्यालयामध्ये बुधवारी (दि.२३) आयोजित अंतिम वर्षातील (२०२१-२०२५) विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभा-प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि अंतिम वर्षाचे विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. डॉ. आर. डी. बेडसे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. एस. शिंदे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. एस. बी. सातपुते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आर. डी. दरेकर यांनी आभार मानले.

# ॥ सुख, समृद्धी आनंद देणारी... अक्षय तृतीया ॥

वैशाख शु. तृतिया म्हणजेच 'अक्षय तृतिया'. जी साडेतीन शुभ मुहूर्त आपण मानतो, त्यातच अक्षय तृतिया हे एक पूर्ण मुहूर्त आहे. हिंदू धर्मातील पवित्र आणि महत्त्वाचा सण मानला जातो. अक्षय तृतीया तिथी २९ एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी पाच वाजून ३१ मिनिटांनी सुरू होत असून ३० एप्रिल २०२५ ला दुपारी दोन वाजून तेरा मिनिटांनी समाप्ती आहे. अक्षय तृतीया ३० एप्रिल रोजी साजरी केली जाईल. अक्षय म्हणजेच क्षय न होणारे, नाश न पावणारे. या दिवशी अन्नपूर्णा देवी जयंती, बसवेश्वर जयंती, नरनारायण या देवतेची जयंती, परशुराम जयंती, असते. या दिवशी महर्षी व्यासांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला प्रारंभ केला आणि त्यांचे लेखनिक म्हणून श्रीगणेशाने काम केले अशी आख्यायिका आहे. ह्या दिवशी दानाचेही अत्यंत महत्व आहे.अक्षय तृतियेच्या दिवशी केलेल्या दानाचेही अधिक पटीने पुण्य मिळत असते, ते चिरकाल टिकणारे असते म्हणून अनेक जण अक्षय तृतीयेस छत्री, पायातल्या वहाणा, पाण्यासाठी माठ, रांजण, पंचे, कापड, वस्त्र, आदींचे गरजू व्यक्तींना, वृध्दाश्रमात, गोरगरिबांचे वस्त्यात जाऊन दान करत असतात. जवस, गहू, हरभरा, दुग्धजन्य पदार्थ, जलकुंभ, सर्व प्रकारचे रस, आणि उन्हाळ्यात उपयुक्त अशा वस्तूचे दान करत असतात.यामुळे अनंत फलप्राप्ती होत असते. या तिथीला केलेले दान, हवन आणि पितरांना उद्देशून जे कर्म केले जाते ते सर्व अक्षय म्हणजे अविनाशी आहे.

ज्याला ज्या प्रमाणात शक्य असेल तेवढे त्यांनी जरूर करावे.सतपात्री दान करावे अशी भावना आहे. या दिवशी भगवान विष्णू आणि लक्ष्मीची पूजा करतात. विधिवत पूजा केल्यास आपले मनोरथ पूर्ण होतात. ह्या सुमारास उन्हाच प्रमाण वाढले असते, तापमान खूप असते.म्हणून अनेक व्यापारी मंडळी, संस्था, काही व्यक्ती रस्तारस्यावर पाणपोई सुरु करतात.जनावरांच्या पाण्यासाठी हौद, हाळ, बांधतात. ज्या ज्या पासून पुण्यप्राप्ती होईल ते.ते करतात.कारण ते अक्षय



आहे.अक्षय तृतियेला पितरांचे स्मरण करुन श्राध्द घालण्याचीही प्रथा आहे.या सणाचे निमित्ताने मनात पितरांची स्मृती जागृत होते. त्यांचे आशिर्वाद घराला मिळतात. या दिवशी पवित्र नद्यांच्या संगमावर किंवा गंगा स्नानाचे महत्त्व आहे गंगास्नानने ती व्यक्ती पवित्र होते पापमुक्त होते असा समज आहे.

अक्षय तृतिया हे नाव पडण्यामागचे कारण"मदनरत्न" ह्या ग्रंथात श्रीकृष्णाने युधिष्ठनाला सांगितले आहे. श्रीकृष्ण म्हणतात, "हे युधिष्ठिरा, या तिथीला केलेले दान, हवन, क्षयाला जात नाही." हा मुहूर्ताचाच दिवस असल्याने, सोने, चांदी, दागिने. मौल्यवान वस्तुंची खरेदी.अनेक शुभ कामांना प्रारंभ केला जातो. नवीन जागा व्यवसाय चे उद्घाटन, नवीन वाहन खरेदी, नवीन संकल्प या दिवशी केले जातात. कोणतेही शुभ कार्य या दिवशी सुरू केल्यास ते कायमस्वरूपी टिकून राहते. या दिवशी कृषिसंस्कृतीचा पालक म्हणून बलरामाची ही पूजा होते. शेतकरी शेतीच्या कामाला सुरूवात करतात.शेतकरी शेती कामासाठी नविन सालदाराची नेमणूक करत असत.आज ही प्रथा काहीच ग्रामीण भागात आढळून येते.काळा नुसार प्रथा बदलतात.







जागतिक पुस्तक दिन
दिलीप देशपांडे
जामनेर, जिल्हा जळगाव
८९९९५६६९१७





सध्या सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने अशा परिस्थितीत ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी पाणपोई काढून पुण्य पदरी पाडावे, अशी स्थिती आहे. ह्या काळात नामस्मरणालाही तेवढेच महत्व आहे.आपल्याला प्रिय असलेल्या देवतेचे होईल तेवढे नामस्मरण करावे. विष्णुसहस्त्रनाम, लक्ष्मीची उपासना, करावी.. ह्या दिवशी केलेल्या नामस्मरणाने घरातील दोष नाहीसे होतात. आपल्याला आवडत्या देवतेचे नमस्मारण किंवा मंत्र पठण याने पुण्य अखंड टिकून राहते . **|| ओम नमो भगवते वासुदेवाय ||** किंवा **|| सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते ||**

हा जप आपण करू शकतो. स्त्रियांनी घरात चैत्र गौरीची स्थापना केली असते. ह्या शेवटच्या दिवशी स्त्रिया हळदीकुंकवाचा कार्यक्रम करतात. गौरीला सांजोरी, करंजी, शेवेचा, नैवेद्यही दाखवतात.त्या निमित्ताने महिला एकत्र येतात.आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे, देतात.मोगऱ्याच्या फुलांचे गजरे देतात. खान्देशात अक्षय तृतीया सण फार उतत्साहात साजरा होतो.खान्देश भागात "आखाजी" म्हणून हा सण ओळखला जातो. ग्रामीण भागात पत्याचे डाव रंगतात. जुगार खेळायला परवानगी असते जणू. तरुण, वयस्कर, सर्वच ह्यात सहभागी होतात. गल्लीत, देवळाच्या ओट्यावर, गोठयात, पारावर, जागोजागी डाव रंगलले दिसतात. मुली माहेरवाशीण म्हणून आलेल्या असतात. त्यांच्या साठी पुरणपोळी, आंब्याचा रस, कटाची आमटी, काही ठिकाणी मांडे( म्हणजे खापरावर केलेल्या मोठ्या पुरण पोळ्या)हा बेत हमखास असतो. अक्षय तृतीया दिवशी मुली माहेरी असतात. खानदेशात अनेक खेड्यामध्ये झाडाला झोके बांधलेले असतात आणि महिला एकत्र जमवून आखाजीची गाणीं म्हणत असतात. बालपणीच्या मैत्रीणींना भेटून आनंदाची उधळण करत असतात. तिथे वयाचा विचार नसतो. अक्षय तृतियेला भगवान परशुरामची जयंती असते. भगवान विष्णूचा हा सहावा अवतार आणि अष्टचिरंजीवा पैकी एक चिरंजीव अशी त्यांची महती आहे. त्यांचे पूजन केले जाते.अनेक ठिकाणी परशुरामाची मिरवणूक काढण्यात येते.आपल्या महाराष्ट्रात चिपळूण जवळ भगवान परशुरामाचे मंदिर आहे. एके वर्षी आम्ही आमच्या सद्गुरू माऊली समवेत सात- आठ दिवस ऋषिकेशला होतो त्यावेळी अक्षयतृतीयेला गंगा स्नान आणि स्वामी शिवानंद स्वामींचे आश्रमात महाप्रसाद घेतला होता. त्या अक्षय तृतीयेचा आनंद अवर्णनीय आहे. या दिवशी- ● अक्षय तृतीया दिवशी पवित्र नदीमध्ये तसेच गंगा स्नानाचे महत्त्व आहे. ● ब्राह्मणाला भोजन देऊन वस्त्रदान तांदूळ, मीठ, फळे, छत्री, वाहाणा, दान करण्याचे महत्त्व आहे.● साडेतीन मुहूर्ता पैकी एक असल्याने या दिवशी सोने चांदी खरेदी नवे वस्त्र खरेदीचे महत्व आहे.वाहन खरेदी करतात.● पाण्याने भरलेली घागर वाळा टाकून ब्राह्मणास दान देतात तसेच या दिवसापासून अनेक लोक पानपोळी सुरू करतात. ● शुभकार्य, संकल्पांची सुरुवात करतात. ● भगवान परशुराम हे सप्तर्षीपैकी एक, तसेच जमदग्नीऋषी आणि रेणुका मातेची पुत्र. अक्षय तृतीयेच्या दिवशी भगवान परशुराम यांची जयंती हिंदू मोठ्या थाटामाटा सादर करतात. ● या दिवशी पवित्र गंगा नदी स्नान केल्याने पापे नष्ट होतात अशी धरणा आहे. ● अक्षय तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा माता यांचा जयंती दिवस देखील मानला जातो. अन्नपूर्णा मातेची पूजा केली जाते. अन्नपूर्णा मातेचे पूजनाने स्वयंपाक घरात जेवणाची चव वाढते आणि घरात अन्नाची बरकत असते.कधीही कमी पडत नाही. अनेक दृष्टीने अक्षय तृतियेचे महत्त्व आहे. सुख. समृद्धी. आनंद. देणारा सण आहे. काळाच्या ओघात अनेक प्रथा परंपरा कमी होत असल्याचे जाणवते. असे सणवार आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे.त्याची जपणूक करणे आपले काम आहे. महाराष्ट्रा सह दक्षिण भारत, पश्चिम बंगाल, राजस्थान, या ठिकाणी अक्षय तृतीया सण साजरा केला जातो. ह्या अक्षय तृतीयेच्या दिवशी आपण सर्व जण एक संकल्प करु . देवासमोर एक धान्याचा आणि दुसरा पाण्याने भरलेला असे कलश ठेउन सुख, समृद्धी साठी अक्षय वरदान मागू या. ह्या वर्षी अक्षय तृतिया ३० एप्रिल रोजी आहे. आपण सगळे सुख, समृध्दि, आरोग्य, या साठी, भगवान विष्णू, अन्नपूर्णा माता आणी लक्ष्मीदेवी कडे प्रार्थना करु या.

**।। सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।**
**।। अन्नपूर्णे सदा पूर्णे शंङ्कर प्राणवल्लभे ज्ञानवैराग्य सिध्यर्थं भिक्षां देही च पार्वती ।।**

## 'शातिर The Beginning' या मराठी चित्रपटाचा टीजर प्रदर्शित

**नाशिक ।** 'शांतिर The Beginning' या मराठी चित्रपटाचा टीजर नुकताच सोशल मिडियावर प्रदर्शित करण्यात आला आहे. संवेदनशील विषयावर बेतलेला, सस्पेन्स थ्रीलर आजच्या तरुणाईची कथा सांगणारा असल्याचे टीजर मधून दिसते. हा चित्रपट येत्या 23 मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.





या चित्रपटाची निर्मिती श्रीयांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्स या बॅनरखाली रेश्मा वायकर यांनी केली असून या चित्रपटाद्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे. या टीजर वरून दिसते की, हा आजच्या तरुणाईची कथा सांगणारा चित्रपट असून कॉलेज तरुणाई मध्ये वाढत असलेल्या अंमली पदार्थाच्या व्यसनांवर भाष्य करणारा असल्याचे दिसतो. पोलिसांवर हल्ला करून पसार झालेला ड्रग्ज माफिया कोण? पोलिस या ड्रग्ज माफियाचा शोध घेण्यात यशस्वी ठरणार का? आणि नायिकेची या सर्व प्रकरणातभूमिका नेमकी काय? हे जाणून घेण्याची उत्कंठा टीजर वाढवतो. चित्रपटाबद्दल बोलताना दिग्दर्शक सुनील वायकर म्हणाले, माझा दिग्दर्शक म्हणुन पाहिलाच प्रयत्न आहे. समाजातील अंमली पदार्थाच्या सेवनामुळे होणारी व्यसनाधीनता आणि त्यामुळे वाढणारी गुन्हेगारी त्या विरुद्धचा कॉलेज मधील विद्यार्थ्यांचा लढा या चित्रपटातून दाखवून एक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या चित्रपटात रेश्मा वायकर या प्रमुख भूमिकेत असून त्यांच्यासह योगेश सोमण, रमेश परदेशी, मीर सरवर, अनिल नगरकर, अभिमन्यू वायकर, वेद भालशंकर, ॲड. रामेश्वर गिते, गौरव रोकडे, निशांत सिंग, मनोज चौधरी यांच्या महत्वपूर्ण भूमिका शातिर The Beginning मध्ये आहेत. येत्या २३ मे २०२५ रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

## शुभतेचा, समृद्धीचा आणि अक्षय पुण्याचा दिवस : अक्षय तृतीया

'ज्याचं शुभारंभ आज होईल, त्याचा उत्कर्ष कधीही संपणार नाही.' "अक्षय तृतीयेच्या पवित्र दिवशी हर कार्यात अनंत यशाचे बीज रोवले जाते." भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणाचा स्वतःचा एक वेगळा गंध आणि गोडवा आहे. वैशाख महिन्यात येणारी अक्षय तृतीया ही अशीच एक दिव्य संधी आहे, जिथे काळाच्या ओघातही ज्याला क्षय नाही असे पुण्य संपादन करता येते. अक्षय तृतीया म्हणजे आनंदाचा, संपत्तीचा आणि सतत चालणाऱ्या मंगलमयतेचा अमूल्य दिवस.

अक्षय तृतीयेचे पौराणिक महत्त्व पुराणांमध्ये उल्लेख आहे की याच दिवशी भगवान विष्णूंच्या दशावतारांपैकी सहावा अवतार असलेले परशुराम यांचा जन्म झाला. म्हणून हा दिवस "परशुराम जयंती" म्हणूनही ओळखला जातो. याशिवाय, याच दिवशी गंगा मातेने पृथ्वीवर आगमन



केले, म्हणून ती जलपूजनासाठीही अत्यंत शुभ मानली जाते. महाभारताच्या कथेत, वनवासात असलेल्या पांडवांना द्रौपदीच्या विनंतीवरून भगवान श्रीकृष्णाने अक्षय पात्र दिले, ज्यातून अखंड अन्नसंपत्ती मिळाली आणि गरिबीचा नायनाट झाला. या सर्व पौराणिक संदर्भांमुळे अक्षय तृतीया ही चिरंतन समृद्धी आणि कल्याण यांचे प्रतीक बनली आहे. मांगल्याचे वटवृक्ष : अक्षय तृतीयेच्या परंपरा अक्षय तृतीया हा असा दिवस आहे, जेव्हा कोणत्याही शुभ कार्यासाठी पंचांग किंवा मुहूर्त पाहण्याची आवश्यकता नसते. विवाह, गृहप्रवेश, नवीन व्यवसायाची सुरुवात, नवीन वस्त्र किंवा दागिन्यांची खरेदी यासाठी हा दिवस अत्यंत अनुकूल मानला जातो. विशेषतः सुवर्ण खरेदीचा या दिवशी मोठा सोहळा होतो. सोने ही केवळ संपत्तीचे नव्हे तर स्थिरतेचे, प्रतिष्ठेचे आणि भविष्य सुरक्षिततेचे प्रतीक मानले जाते. म्हणूनच अक्षय तृतीयेच्या दिवशी सोनं खरेदी करणं म्हणजे आपल्या जीवनात अक्षय समृद्धीला आमंत्रण देणं. दानधर्माचा खरा अर्थ. मात्र अक्षय तृतीयेचे खरे स्वरूप केवळ वैभवप्राप्तीमध्ये नाही. या दिवशी केलेल्या दानाला विशेष महत्त्व आहे. अन्नदान, जलदान, गोदान, वस्त्रदान, शिक्षणदान यांना अक्षय पुण्य लाभते. समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देणे, वृक्षारोपण करणे, ज्ञानदान करणे – हे सारे अक्षय पुण्याचे मार्ग आहेत. या दिवशी आपल्यातही एक नवा उत्साह, नवी मानवतेची भावना रुजवली पाहिजे. नवचैतन्याचा संकल्प- अक्षय तृतीया म्हणजे फक्त संपत्तीची वाढ नव्हे, तर आध्यात्मिक उन्नतीचाही आरंभ आहे. आपले विचार, आपली कार्यशैली, आपले जीवन अधिक सकारात्मक, मंगल आणि शांततामय बनवण्यासाठी हा दिवस एक सुंदर संधी आहे.

जेव्हा आपण आपल्यात प्रेम, करुणा, दया आणि मदतीची भावना वाढवतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपले जीवन अक्षय होते. शेवटी, अक्षय तृतीया आपल्याला स्मरण करून देते- "समृद्धी बाहेरून येते, पण खरे अक्षयत्व मनाच्या गाभ्यात असते." या पवित्र दिवशी आपण सर्वांनी जीवनात सच्चे सौंदर्य, पुण्याई आणि सकारात्मकतेचा जागर करू या!

**– नितीन ओस्तवाल,**
**मो. 8793087930**

## 'लेण्यांचा महाराष्ट्र' पुस्तक नव्हे तर एक जिवंत यात्रा

'लेण्यांचा महाराष्ट्र' एका प्रवासवर्णनकाराने लिहीलेला, प्रत्येक वाचकाच्या मनात दीप लावणारा ग्रंथ आहे. 'लेण्यांचा महाराष्ट्र' हे लेखक संदीप राक्षे यांनी लिहीलेलं, चंद्रपूर येथील श्रीसाई प्रकाशनने छापलेल व स्वतः संदीप राक्षे यांनी मुखपृष्ठ तयार केलेलं पुस्तक म्हणजे एखाद्या वाचकाला इतिहासाच्या जडलेल्या खुणांमध्ये फेरफटका घालायला लावणारी एक अद्भुत यात्रा आहे. संदीप राक्षे यांनी अतिशय सुसंगत, तरल, ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण शैलीत महाराष्ट्रातील प्राचीन लेण्यांचा विस्तृत असा परिचय करून दिला आहे. लेण्यांची वास्तुशिल्पीय वैशिष्ट्ये, त्यांच्या निर्मितीची कथा, त्यामागील धार्मिक आणि सांस्कृतिक संदर्भ याचे सुंदर मिश्रण या पुस्तकातून वाचायला मिळते. पुस्तक वाचताना जाणवतं की लेखक फक्त माहिती देत नाही, तर प्रत्येक लेण्यांच्या ठिकाणी स्वतःचं अनुभवलेलं अंतरंग आपल्यासमोर उलगडतो. त्यांच्या शब्दातून लेण्यांमधील शांतता, त्या शिल्पांवर कोरलेल्या इतिहासाच्या रेषा आणि काळाच्या प्रवाहात टिकून राहिलेली श्रद्धा हे सर्व अनुभवता येते.विशेषतः अजिंठा लेणी, पितळखोरे लेणी, भामचंद्र लेणी, पाताळेश्वर लेणी, त्रिरश्मी लेणी, अंकाई टंकाई लेणी, चांदवड जैन लेणी अशा अनेक प्रसिद्ध तसेच तुलनेने अल्पपरिचित लेण्यांचे देखील त्यांनी सुंदर आणि सखोल वर्णन केले आहे. भटकंतीच्या दरम्यान आलेल्या अडचणी, स्थानिकांचे किस्से, अप्रत्यक्ष मिळालेल्या कथा, लेण्यांभोवती पसरलेली निसर्गसंपन्नता यामुळे हे पुस्तक केवळ प्रवासवर्णन न राहता, एक जीवनानुभव आहे.या पुस्तकातली भाषा अत्यंत प्रवाही आहे. कुठेही कंटाळवाणं होत नाही. काही ठिकाणी वर्णन इतकं प्रभावी होतं की एखादं लेणं डोळ्या समोर उभं राहतं. त्यातील इतिहासप्रेम, पुरातत्त्वीय दृष्टिकोन, आणि निसर्गाच्या सौंदर्याबद्दलची आस्था वाचकाच्या मनात एक आगळं वेगळं स्थान निर्माण करते. संदीप राक्षे यांनी महाराष्ट्रभर पसरलेल्या या लेण्यांच्या दिशेने एक जाणीवपूर्वक प्रवास केला आहे. डोंगर दऱ्या चढत, रानवाटांमधून चालत, उन्हाच्या कडाक्यात किंवा पावसाच्या सरीत न्हालेल्या वाटांवरून. संपूर्ण पुस्तकात एक गोड भटकंतीची ओढ आहे. लेखक प्रत्येक ठिकाणी पोचतो तेव्हा केवळ भौगोलिक माहिती देत नाही, तर त्या लेण्यांच्या काळजात डोकावतो कोणत्या कारागिराने हा शिल्पप्रपंच घडवला





असेल? त्या काळात कोणत्या धर्माचा, कोणत्या तत्त्वज्ञानाचा सुगंध इथे दरवळत असेल? हे सारे प्रश्न आपल्याला जाणवायला लागतात. नामांकित लेण्यांबरोबरच अनेक अल्पपरिचित गुहांचीही रत्नं लेखकाने आपल्या पावलांनी उलगडली आहेत. संदीप राक्षे यांची लेखनशैली ओघवती आहे, पण तरीही ती अतिनाटकी किंवा कृत्रिम वाटत नाही. त्यांचे शब्द वाचताना एकदम साधेपणाने, पण गहि-याने इतिहास डोळ्यांसमोर उभा राहतो. प्रत्येक प्रकरणात माहिती, भावना आणि सौंदर्य यांचा सुरेख मेळ साधला आहे. संदीप राक्षे लिखित "लेण्यांचा महाराष्ट्र" हे पुस्तक वाचताना वाटतं, एखाद्या साधकाने जसं मंदिराभोवती परिक्रमा करावी, तसं लेखकाने महाराष्ट्राच्या लेण्यांच्या प्रदक्षिणा घातली आहे. प्रत्येक लेण्याचं, प्रत्येक मूर्तीचं आणि प्रत्येक ओसंडून वाहणाऱ्या नक्षीचं त्यांनी जणू स्मरण केलं आहे. आपुलकीने, जिव्हाळ्याने आणि खोल आदरभावाने. हे पुस्तक केवळ एक प्रवासवर्णन नाही. हे आहे, काळाच्या दगडी भिंतींवर उमटलेल्या इतिहासाचा शोध. लेखकाने अतिशय सूक्ष्म निरीक्षणाने प्रत्येक लेण्याचं वर्णन केलं आहे. केवळ त्यांची स्थापत्य वैशिष्ट्यं नाही, तर त्यांच्या मागचं तत्त्वज्ञान, तेथील वातावरण, तिथं भरलेली शांतता, आणि त्या शांततेच्या आतल्या गुंजनाऱ्या भक्तीचीही त्यांनी जाण करून दिली आहे. प्राचीन लेण्यांचा अत्यंत तपशीलवार आणि अभ्यासपूर्ण परिचय प्रवाही आणि ओघवती भाषा, नव्या वाचकांना भटकंतीसाठी प्रेरणा देणारी शैली "लेण्यांचा महाराष्ट्र" हे फक्त पुस्तक नाही, तर काळाच्या दगडी पायऱ्यांवरून चालत जाणारी एक जिवंत यात्रा आहे.ज्यांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशात रस आहे, त्यांनी हे पुस्तक नक्की वाचावं.संदीप राक्षे यांनी लिहीलेल्या प्रत्येक पुस्तकावर जरी पुस्तकाची किंमत लिहीलेली असली, तरी संदीप राक्षे हे पुस्तकांचे पैसे अजिबात घेत नाहीत. लिहिलेल्या पर्यटनस्थळांची वाचकांना माहिती व्हावी, त्या पर्यटन स्थळांचा प्रचार व्हावा, विकास व्हावा हाच प्रमुख उद्देश असतो. म्हणून संदीप राक्षे हे महाराष्ट्रात भटकंती करताना प्रत्येक शाळेच्या ग्रंथालयाला मोफत पुस्तक भेट देतात ही विशेष व कौतुकास्पद बाब आहे.. अंकाई टंकाई, चांदवड जैन लेणीचे वारे,पितळखोरेच्या गूढ गुहेत फिरणारे,हात जोडून दगडांना स्पर्श करतो,शब्दांत गुंफतो दगडी स्वप्नांचे झरे.डोंगरांनी कुरवाळलेल्या या लेण्या,जपतात अखंड भारताचे तपोभूमी गीत,त्या काळजाच्या कोपऱ्यांत जपलेली, श्रद्धेची, साधनेची एक जिवंत प्रीत. संदीप सरांच्या शब्दांनी वाजले, घंटानाद, दगडातुन निघाले जसे जिवंत गान, "लेण्यांचा महाराष्ट्र" ही केवळ यात्रा नाही, ती आहे काळाच्या मंदिरांची एक अंतरी वाण.

**– लेखिका : सीमा माने, पुणे**

# पोलीस दलामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी, अंमलदारांना महासंचालकांचे सन्मानचिन्ह



**युवराज पतकी,**
**वरिष्ठ पोलिस निरीक्षक, विशेष शाखा**



**अंकुश भालचंद्र चिंतामण**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक, म्हसरूळ पोलीस स्टेशन**



**रणजित पंडित नलावडे**
**सिनियर पी.आय., सातपूर पोलिस स्टेशन, नाशिक**



**मनोहर कारंडे**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक नाशिक**

**नाशिक ।** पोलीस दलामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नाशिक शहर व ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.

यामध्ये शहर आयुक्तालय विशेष शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज पत्की, पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे, सातपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंजीत नलावडे, मसूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अंकुश चिंतामण,याचबरोबर गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार धनंजय शिंदे, इंदिरानगरचे पोलीस हवालदार सुधाकर गायकवाड, गुन्हे शाखेचे प्रशांत मरकड,नाशिकरोड पोलीस ठाण्याचे अविनाश देवरे, गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस हवालदार नाझीमखान पठाण व वाहतूक शाखेचे राजेंद्र सांगळे पोलीस हवालदार चंद्रकांत जगदाळे यांचा समावेश असून पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



**नितीन श्रावण धोंडगे**
**मोटार परिवहन पर्यवेक्षक**



**धनंजय कौतिक शिंदे**
**गुन्हे शाखा, युनिट- १, नाशिक शहर**



**सुधाकर संभाजी गायकवाड**
**इंदिरानगर पोलीस स्टेशन**



**प्रशांत रामदास मरकड**
**गुन्हे शाखा युनिट १, नाशिक शहर**



**अविनाश माणिक देवरे**
**नाशिकरोड पोलीस ठाणे, नाशिक**



**नाझिमखान किरमोहमद पठाण, गुन्हे शाखा युनिट १, नाशिक शहर**



**राजेंद्र दत्तात्रय सांगळे**
**ट्राफिक ब्रँच, युनिट २, नाशिक**



**चंद्रकांत शिवाजी जगदाळे**
**पोलिस हवालदार**



**मुकुंद माधवराव महाजन**
**BDDS, नाशिक शहर**

# आता इगतपुरी ते कसारा अंतर अवघ्या सात मिनिटांत!

**नाशिक ।** समृद्धी महामार्गावरील इगतपुरीपासूनचा मुंबईकडील प्रवास आणखी जलद होण्यासाठी इगतपुरी येथे देशातील सर्वांत मोठा व पहिला सुमारे ७.८ किलोमीटरच्या सहापदरी बोगद्याचे काम पूर्ण होत आले असून, येत्या महाराष्ट्रदिनी त्याचे लोकार्पण होत आहे. यामुळे इगतपुरी ते कसाऱ्यादरम्यानचे महामार्गावरील अंतर गाठताना होणारी दमछाक कमी होणार असून, केवळ सात मिनिटांत हे अंतर पार करता येणार आहे, हे विशेष. घोटी ते मुंबई हे अंतर अवघ्या दीड तासात पार करता येणार आहे. त्यामुळे दळणवळणाला नवा आयाम मिळेल.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून निर्माण करण्यात आलेल्या या बोगद्यामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात उपयोजना उभारण्यात आल्या आहेत. महामार्गातील सर्वांत आव्हानात्मक भाग असतानाही दिलेल्या मुदतीच्या सहा महिने अगोदर हे काम पूर्ण झाले आहे. पायाभूत सुविधांसंदर्भात मैलाचा दगड ठरणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मुंबई- नागपूर समृद्धी महामार्गाचे लोकार्पण येत्या १ मेस होत आहे. समृद्धी महामार्ग ६२५ किलोमीटरचा उभारताना सोळा पॅकेज वेगवेगळे करण्यात आले होते. यापैकी नागपूरपासून सुरू होणारे क्रमांक १ ते १३ नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीपर्यंत हा मार्ग वाहतुकीसाठी यापूर्वीच खुला करण्यात आलेला आहे. यामधील सर्वांत आव्हानात्मक व अवघड असलेला क्रमांक १४ पॅकेज होय, तो म्हणजे भारतातील पहिला सहापदरी ७.८ किलोमीटरचा बोगदा (टनेल) आहे. सप्टेंबर २०१९ मध्ये सुरू केलेले हे काम कोविड कालावधीतही सुरू होते. एमएसआरडीसीचे संचालक अनिलकुमार गायकवाड, मुख्य अभियंता साहेबराव सुरवसे, टनेल एक्स्पर्ट माजीद इम्रान, सुरक्षा अधिकारी जगन्नाथ मंडल व प्रकल्प व्यवस्थापक शेखर दास यांची सर्व टीम अहोरात्र हा बोगदा उभारणीमध्ये गेल्या पाच वर्षांपासून कार्यरत होती.

**मिस्ट तंत्रज्ञानाने आगीपासून संरक्षण**- साडेसात किलोमीटरच्या बोगद्यामध्ये वाहतूक सुरू असताना अपघात होऊन आग लागली, तर यासाठी विशिष्ट योजना व तंत्रज्ञान वापरलेले आहे. वाहनांना आग लागल्यास मिस्ट या तंत्रज्ञानामुळे आपोआपच सेंसरद्वारे पाण्याचे फवारे सुरू होतील. त्यामुळे आग आटोक्यात येईल. बोगद्याच्या वरच्या भागावर विशिष्ट केमिकल लावण्यात आले आहे. त्यामुळे आग लागली तरी ती किमान दोन तास इतर भागांमध्ये पसरणार नाही.

**ही आहेत वैशिष्ट्ये- * लांबी ७.८ किलोमीटर * उंची ९.२ मीटर * रुंदी १७ मीटर * मुंबई व नागपूर दोन्ही बाजूंसाठी स्वतंत्र बोगदे * कामाचा कालावधी पाच वर्षे * चार हजार अभियंते, * कर्मचारी कार्यरत * एकूण खर्च तीन हजार कोटी रुपये * बोगद्याच्या दर्शनी भागावर भारतीय संस्कृती, अध्यात्म, प्राणी-पक्षी, आदिवासी संस्कृतीचे चित्र रेखाटन * संपूर्ण बोगदा हा सीसीटीव्हीच्या नियंत्रणाखाली * दुरुस्तीसाठी पायी जाण्यास स्वतंत्र व्यवस्था * नेटवर्क व अत्यावश्यक सूचनांसाठी यंत्रणा**



**देखभाल दुरुस्तीसाठी क्रॉस पॅसेज**- संपूर्ण बोगद्यामध्ये २६ ठिकाणी क्रॉस पॅसेजद्वारे वाहतूक वळविण्याची सोय करण्यात आली आहे. बोगद्यामध्ये जर देखभाल दुरुस्तीचे काम सुरू असेल तर विशिष्ट अंतरावर वाहतूक एका क्रॉस पॅसेजमधून दुसऱ्या ठिकाणी वळविता येईल.

**नादुरुस्त वाहनांसाठी सात ठिकाणी जागा**- बोगद्यामध्ये वाहनांमध्ये काही बिघाड झाल्यास वाहतुकीस अडथळा होऊ नये, तसेच वेगाने येणाऱ्या वाहनाने नादुरुस्त झालेल्या वाहनाला मागून धडक देऊ नये यासाठी संपूर्ण बोगद्यामध्ये विशिष्ट अंतरावर ७ ले बाय विशिष्ट जागा ठेवण्यात आल्या आहेत.

**बोगद्याच्या प्रवेशात विशिष्ट प्रकाश योजनेची रचना**- वाहनांचा बोगद्यामध्ये विशेष करून दिवसा प्रवेश होईल. त्या वेळी बाहेरील नैसर्गिक प्रकाश व बोगद्यामधील प्रकाश यामध्ये काही फरक वाहनचालकांना जाणवू नये, यासाठी बोगद्याच्या अलीकडे ४०० मीटर लांबीचे शेड बनविण्यात आले आहे. त्या शेडमधून बोगद्यात जाताना हळूहळू नैसर्गिक प्रकाश कमी होत जातो. जेणेकरून वाहनचालकांना बोगद्याबाहेरील व आतील वातावरण एकसारखे जाणवेल.

**आपत्कालीन परिस्थितीसाठी पर्यायी वेगळा बोगदा**- साडेसात किलोमीटरच्या बोगद्यामध्ये व्हेंटिलेशनसाठी विशिष्ट तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. बोगद्यामध्ये हवा खेळती राहावी व त्यामध्ये कार्बन डायऑक्साइड व मोनॉक्साइड तयार होऊ नये म्हणून इन्कलाइड व्हेंटिलेशन शेफ्ट पाचशे मीटरचा एक वेगळा बोगदा तयार केला आहे. त्याद्वारे आपत्तीकालीन परिस्थितीत वाहने तिथून बाहेर पडू शकतात.

**एफकॉन कंपनीने उभारला आव्हानात्मक बोगदा**- या आव्हानात्मक बोगद्याची काम एफकॉन या कंपनीला मिळाले आहे. ज्या कंपनीने अगोदरही दिल्ली मेट्रो, बुलेट ट्रेन, जम्मू-कश्मीर येथील चिनाब नदीवरील पूल, श्रीनगर-दिल्ली कटरा मार्ग अशी कामे केलेली आहेत.

# डॉ. पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप

## भावी डॉक्टरांनी तन अन् मनाने तंदुरुस्त असावे : डॉ. द्रविड




**नाशिक । आडगाव येथील मविप्रच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या 'युवान २०२५' या वार्षिक स्नेहसंमेलनात मार्गदर्शन करताना धुळे येथील भाऊसाहेब हिरे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे सेवानिवृत्त अधिष्ठाता डॉ. नंदकुमार द्रविड. समवेत व्यासपीठावर मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, डॉ. मृदुला द्रविड, शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे.**

### विद्यार्थी, मार्गदर्शक डॉक्टर्सचा सन्मान

यात्रसंगी युवान वार्षिक स्नेहसंमेलन अंतर्गत झालेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण संपन्न झाले. यावेळी विविध संशोधन प्रकल्प आणि स्पर्धा यामध्ये निवड आणि विजयी झालेल्या विद्यार्थी, मार्गदर्शक डॉक्टर्स यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट विभाग म्हणून पीडियाट्रिक व फिजिओलॉजी विभागांना गौरविण्यात आले.

**नाशिक ।** विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षण घेत असताना खेळाच्या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्ती, कलेच्या माध्यमातून मन या दोन्हींची जोपासना करायला हवी. तरच तुम्ही भावी डॉक्टर म्हणून समाजाची चांगली सेवा करू शकाल, असे प्रतिपादन धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे सेवानिवृत्त अधिष्ठाता डॉ. नंदकुमार द्रविड यांनी व्यक्त केले.

मविप्र समाजाच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय व संशोधन केंद्राच्या युवान २०२५ वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे होते. यावेळी व्यासपीठावर एसीपीएम मेडिकल कॉलेज धुळे येथील मायक्रोबायोलॉजी विभागाच्या प्रमुख मृदुला द्रविड, शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे व विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तृतीय वर्ष एमबीबीएस विद्यार्थिनी पूजा एरंडोले हिने शारदीय स्तवन सादर केले. दीपप्रज्वलन करून मविप्र समाजधुरीन कर्मवीरांना अभिवादन करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत केल्यानंतर सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे यांनी मविप्र संस्थेची माहिती, डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाची मागील वर्षाची कामगिरी व रुग्णालयातील सोयी- सुविधा, क्रीडा, पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी आणि शिक्षकांचे शैक्षणिक व संशोधनातील उल्लेखनीय यशाची माहिती दिली. विद्यार्थी जनरल सेक्रेटरी गणेश शेळके याने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी संशोधन समन्वयक डॉ. अशोक वनकुद्रे यांनी महाविद्यालयातील वर्षभरातील संशोधनाचा आढावा घेतला. जनरल सेक्रेटरी गणेश शेळके याने सूत्रसंचालन केले. डेप्युटी जनरल सेक्रेटरी ईश्वरी पाटील हिने आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी विविध विभागांचे प्रमुख शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रुग्णांना माफक दरात दर्जेदार सेवासुविधा : ॲड. ठाकरे

मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत वैद्यकीय महाविद्यालयाची, रुग्णालयाची प्रगती कौतुकास्पद असल्याचे सांगितले. मविप्र रुग्णालयात रुग्णांना माफक दरात दर्जेदार व सर्वोत्कृष्ट वैद्यकीय सोयीसुविधा निर्माण करून देण्यासाठी मविप्र कार्यकारणी प्रयत्नशील आहे. चांगली वैद्यकीय सेवा देताना सामाजिक दातृत्व जपले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

## ➢ महत्त्वाचे

### पिंपळगाव बसवंत होरायझन अकॅडमीचा अभिनव उपक्रम

**नाशिक ।** पृथ्वी आपली जीवनवाहिनी. ती आहे म्हणून आपण आहोत. पृथ्वी म्हणजे पर्यावरण आणि पर्यावरण वाचवण्यासाठी खारीचा वाटा म्हणून पिंपळगाव बसवंत येथील मविप्र संचलित होरायझन अकॅडमीमध्ये शाळेतील सर्व विद्युत उपकरणे ४० मिनिटांसाठी बंद ठेवून वीजबचत करण्यात आली. 'संकल्प नको, कृती करूया, वसुंधरा संवर्धनासाठी कटिबद्ध होऊया...' असा संदेश देत शाळेच्या प्राचार्या ए. जी. नायडू यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनीदेखील आपल्या घरी दररोज किमान २० ते ३० मिनिटे वीज वाचवून पर्यावरण रक्षणासाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन शिक्षकांनी केले. जागतिक वसुंधरा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ४ थीच्या ईश्वरी कावळे, रुही गायखे आणि इयत्ता ९ वीची आनंदी पवार या विद्यार्थिनींनी जागतिक वसुंधरा दिनाबद्दल माहिती सांगितली. शिक्षिका अर्चना झोपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर चित्र रंगवणे, क्ले पासून पृथ्वीची प्रतिकृती तयार करणे, पोस्टर बनविणे, निबंध स्पर्धा, इंटर हाऊस पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन यासारखे उपक्रम राबविण्यात आले. त्यानंतर 'सेव अर्थ' ( Save Earth ) नावाचे पोस्टर बनविण्यात आले. ज्यात विद्यार्थ्यांसोबत प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक वर्ग यांनीदेखील सहभाग नोंदवला. यातून पृथ्वी वाचवण्यासाठी प्रत्येकाने हातभार लावायचा आहे, असा संदेश देण्यात आला.

# कांदा खरेदीतील घोटाळ्याची चौकशी न झाल्यास स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटनेतर्फे आंदोलनाचा इशारा

**नाशिक ।** कांदा उत्पादक व ग्राहकांच्या फायद्यासाठी सुरू केलेली नाफेड व एनसीसीएफ मार्फत होणारी कांदा खरेदी भ्रष्टाचाराच्या गर्तेत अडकली आहे. या भ्रष्टाचाराची तात्काळ चौकशी व्हावी व एक महिन्याच्या आत दोषींविरुद्ध कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा स्वतंत्र भारत पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी दिला. मूल्य स्थिरीकरण निधी अंतर्गत होणाऱ्या कांद्याची खरेदी योग्य दराने व्हावी, अशीही मागणी घनवट यांनी केली.

स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत अनिल घनवट यांनी नाफेड विरुद्ध गंभीर आरोप केले आहेत.



नाफेडमार्फत होणाऱ्या कांदा खरेदीमध्ये काही व्यापारी फेडरेशन, वाहतूक ठेकेदार,अधिकारी व काही शेतकरी मिळून शेतकरी व ग्राहकांच्या फायद्यासाठी असलेल्या सरकारी निधीचा अपहर करीत आहेत.महागाई नियंत्रणा ठेवण्यासाठी कांद्याची निर्यात बंद करणे, निर्यात मूल्य वाढविणे, निर्यात शुल्क लावणे व साठा मर्यादा घालणे अशी उपाययोजना होत असते, आज कांद्याचे भाव पडलेले असताना सरकारने उत्पादन खर्च भरून निघेल इतका दर निश्चित करायला हवा नाही तर सरकारने नाफेडची खरेदी बंद करावी व कांदा व्यापारातील सरकारी हस्तक्षेप कायमचा बंद करायला हवा याबाबत घनवट यांनी ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांना निवेदन दिल्याचे सांगितले.

सुरुवातीच्या काळात नाफेड ने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करून कांद्याची वर्गवारी करून जास्तीत जास्त उत्तम दर्जाचा कांदा खरेदी करण्याची योजना केली होती.त्यात सरकारी निधीचा योग्य वापर केला होता मात्र कांद्याची सर्व खरेदी भ्रष्ट लोकांनी हातात घेतली व करदात्यांच्या पैशांची लूट सुरू झाली आहे.

नाफेड व एनसीसीएफ मार्फत खरेदी केलेला कांदा राज्यात पाठविण्याची योजना होती. गोवा,आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात या राज्यांमध्ये कांदा पाठवायचा होता तो न पाठवता वाहतुकीची खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली. पण यात फक्त गोवा सहकारी मार्केटिंग फेडरेशन विरुध्द नाशिक येथे गुन्हा दाखल करण्यात आला मात्र इतर राज्यांमध्ये पुरवठा केलेल्या कांद्याच्या घोटाळ्याची चौकशी करून गुन्हे दाखल व्हायला हवेत अशी ही मागणी त्यांनी केली आहे. बहुतांश फेडरेशनच्या साठ्यात असलेला कांदा संगणमताने खुल्या बाजारात जास्त दराने विकला नाफेड व एनसीसीएफला कमी किमतीतला लाल कांदा पुरविण्यात आला.एनसीसीएफ मध्ये असे प्रकार जास्त झालेले आहे. मात्र कोणावर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. नाफेडचे चेअरमन यांनी नाशिक येथील कांदा साठ्यांना अचानक भेट दिली होती,तेव्हा त्यांना गैरप्रकार होत असल्याचे लक्षात आले,त्यानंतर व्यवस्था सुधारण्याऐवजी जास्तच भ्रष्ट झाल्याचे दिसून येते कांदा खरेदीचा परवाना मिळवणे वाहतुकीसाठी गाड्या उपलब्ध करून घेणे वगैरे साठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना लाच द्यावी लागते.तपासणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना खुश करावे लागते कांदा खरेदीमध्ये होणारे गैरप्रकार थांबावेत व शेतकरी आणि ग्राहक यांच्यासाठी सरकारी खर्च असलेला करदात्यांचा पैसा योग्य ठिकाणी खर्च व्हावा यासाठी स्वतंत्र पक्ष व शेतकरी संघटना सजग राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कांदा खरेदीवर लक्ष ठेवण्यासाठी अनेक समित्या स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यात होत असलेल्या कांदा खरेदीतील घोटाळ्याची एक महिन्यात चौकशी होऊन दोषींवर कारवाई नझाल्यास स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनाला रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याची माहिती धनवटे यांनी दिली. या वेळी स्वतंत्र भारत पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा सीमा नरोडे, नाशिक जिल्हा शेतकरी संघटना अध्यक्ष अर्जुन बोराडे, नाशिक जिल्हा स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष बाळासाहेब धुमाळ इगतपुरी तालुका शेतकरी संघटना अध्यक्ष किसन शिंदे उपस्थित होते.

# सावट युद्धाचे!



२२ एप्रिल रोजी पहलगामजवळील बैसरन व्हॅलीमध्ये दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली होती. त्यात एका नेपाळी नागरिकाचाही समावेश होता. १० हून अधिक लोक जखमी झाले. बैसरन खोऱ्यात मोठ्या संख्येने पर्यटक उपस्थित असताना हा हल्ला झाला. मृतांमध्ये उत्तर प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि ओडिशातील पर्यटकांचा समावेश आहे. नेपाळ आणि युएईमधील प्रत्येकी एक पर्यटक आणि दोन स्थानिक नागरिकांचाही मृत्यू झाला.

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताच्या संभाव्य हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानने दहशतवाद्यांना नियंत्रण रेषेजवळून माघार घेण्याचे आदेश दिले आहेत. हे भाग जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा या दहशतवाद्यांना काश्मीरमध्ये घुसखोरी करण्यासाठी लाँचिंग पॅड मानले जातात.

पाकिस्तानी लष्कराला भीती आहे की भारत या तळांना लक्ष्य करू शकतो. आतापर्यंत किती दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला याची नेमकी संख्या अद्याप समोर आलेली नाही. परंतु अहवालांनुसार, ही संख्या ३०-५० च्या दरम्यान असू शकते.

पाकिस्तानी सैन्याने या दहशतवाद्यांना त्यांच्या बंकर आणि सुरक्षित लपण्याच्या ठिकाणी हलवले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हे लाँचिंग पॅड दूधनियाल, अथमुकाम, लिपा, फॉरवर्ड कहुटा आणि कोटली सारख्या नियंत्रण रेषेजवळील भागात आहेत. येथे, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीर सरकारने सर्व ट्रेकिंग क्रियाकलापांवर बंदी घातली आहे. दक्षिण आणि उत्तर काश्मीरमधील अनेक ट्रेकिंग मार्गांवर दहशतवाद्यांच्या हालचाली असल्याची भीती सुरक्षा यंत्रणांना आहे.

युद्धाच्या भीतीच्या पार्श्वभूमीवर, तुर्कीचे सात सी-१३० हरक्यूलिस लष्करी विमान २७ एप्रिलच्या रात्री कराची आणि इस्लामाबादला पोहोचले. यापैकी ६ विमाने इस्लामाबादमध्ये आणि एक विमान कराचीतील पाकिस्तान हवाई दलाच्या तळ फैसल येथे उतरले. त्यांनी युद्ध साहित्य आणले आहे. पाकिस्तानी लष्कराचे अनेक रणगाडे (अल-खालिद) आणि लढाऊ विमाने (जेएफ-१७) जुनी आहेत आणि त्यांची क्षमता मर्यादित आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तान युद्ध साहित्य गोळा करण्यात व्यस्त आहे.

भारतीय नौदलाने अरबी समुद्रात आपल्या युद्धनौकांमधून अनेक क्षेपणास्त्रांची चाचणी घेतली. ही चाचणी पूर्णपणे यशस्वी झाली. नौदलाने सांगितले की ते रात्रंदिवस देशाचे रक्षण करण्यास सज्ज आहेत. समुद्रात कुठेही धोका असला तरी आपण त्याचा सामना सहजपणे करू शकतो.

नौदलाने आयएनएस सुरतवरून या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली. नौदलाने समुद्रात तरंगणारे एक छोटे लक्ष्य उद्धवस्त केले. आयएनएस सुरत गुजरातमधील सुरत येथील दमण सी फेस येथे तैनात आहे. हे युद्धनौका १६४ मीटर लांब आणि ७,४०० टन वजनाचे आहे. त्याचा कमाल वेग ३० नॉट्स (सुमारे ५६ किमी/तास) आहे. हे अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज आहे - ब्राह्मोस आणि बराक-८ क्षेपणास्त्रे आणि एआय आधारित सेन्सर सिस्टम.

२८ एप्रिल रोजी, पहलगाम हल्ल्याच्या वृत्तांकनावरून भारताने अनेक पाकिस्तानी यूट्यूब चॅनेलवर बंदी घातली. यामध्ये क्रिकेटपटू शोएब अख्तर, डॉन न्यूज, समा टीव्ही आणि जिओ न्यूज यांचा समावेश आहे. सरकारचे म्हणणे आहे की हे चॅनेल भारत आणि सुरक्षा एजन्सींविरुद्ध खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या चालवत आहेत.

गृह मंत्रालयाच्या शिफारशीनुसार, भारत सरकारने १६ पाकिस्तानी यूट्यूब चॅनेलवर बंदी घातली आहे. सरकारी सूत्रांनुसार, या वाहिन्यांवर भारत, भारतीय लष्कर आणि सुरक्षा संस्थांविरुद्ध भडकाऊ, सांप्रदायिक आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवण्याचा आरोप आहे.

**पाकिस्तानविरुद्ध ५ मोठे निर्णय**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कडक कारवाई केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ बैठकीत पाच प्रमुख निर्णय घेण्यात आले.

**मास्टरमाइंड मुसा**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी मंगळवारी मोठी माहिती समोर आली आहे. गुप्तचर संस्थेच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्याचा मास्टरमाइंड पाकिस्तानचा माजी एसएसजी कमांडर हाशिम मुसा आहे. सूत्रांनी दिव्य मराठीला सांगितले की, मुसा सध्या लष्कर-ए-तैयबासाठी काम करत आहे.

लष्करनेच त्याला जम्मू आणि काश्मीरमध्ये पाठवले होते जेणेकरून तो सुरक्षा दलांवर आणि बिगर-काश्मिरींवर हल्ले करू शकेल. मुसाने ऑक्टोबर २०२४ मध्ये गंदरबलमधील गगनगीर येथे हल्ला केला. यामध्ये अनेक कामगार आणि एका स्थानिक डॉक्टरला आपला जीव गमवावा लागला. बारामुल्ला हल्ला देखील मुसानेच केला होता, ज्यामध्ये २ सैन्य सैनिक आणि २ पोर्टरना आपले प्राण गमवावे लागले. दरम्यान, भारताकडून प्रत्युत्तराच्या शक्यतेने पाकिस्तान मात्र धास्तावला आहे.

■ ■ ■

### पहलगाम अतिरेकी हल्ला जीव गमावणारे २६ जण






# बोर्ड बदलल्याने गुणवत्ता येईल?

राज्यातील शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) चा अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात निर्देश जारी करण्यात आले आहेत. हा बदल शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रत्यक्षात येणार असून, चालू शैक्षणिक वर्षापासूनच शाळांमध्ये उइरए पॅटर्नचा अवलंब सुरू झाला आहे.

सरकारच्या मते, या निर्णयामागे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेसाठी तयार करणे हाच मुख्य हेतू आहे. उइरए हा अभ्यासक्रम देशभरात मान्यता प्राप्त असून त्यामधून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दजार्चे शिक्षण मिळते, अशी भूमिका शासनाने मांडली आहे. विज्ञान, गणित आणि इंग्रजी यांसारख्या विषयांवर विशेष भर दिला जाणार असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यमापन पद्धतीतही सुधारणा केली जाणार आहे.

पण हा बदल लागू करताना काही आव्हानांचाही देखील सामना करावा लागू शकतो. खर म्हणजे पालनकांमध्ये असणारा संभ्रम, काही प्रश्न, दृष्टीकोन जे निर्माण झालेले आहेत ते कोण दूर करेल? हाच प्रश्न उरतो.

आपल्या या सुसंकृत महान महाराष्ट्राला उज्वल शैक्षणिक परंपरा आहे. एके काळी महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याकडे देशाच्या शिक्षणाची प्रयोगशाळा म्हणून बघितले जात असे. बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांनी कित्येक पिढ्यांना घडवले, दजेर्दार शिक्षण पद्धती आणि यातूनच घडलेले अधिकारी, स्वतः राज्यकर्ते, हीच याची पोच पावती होय. आणि मग असे असताना आपल्या राज्यात सीबीएसई अभ्यासक्रम पद्धती स्वीकारणे म्हणजे आपल्याच राज्यातील शिक्षणतज्ज्ञ, शिक्षण अभ्यासक, शिक्षक आणि एकूणच शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रशासकीय व्यवस्था यावर अविश्वास दाखविण्यासारखे नाही का? असे प्रश्न निर्माण होतात की तुम्हाला आपल्याच शिक्षकांवर विश्वास नाही का? हा निर्णय आपल्याच शैक्षणिक मूल्यांवर आणि मराठी शाळांवर गदा आणणारा तर ठरणार नाही ना? आणि मग यातूनच मराठी शाळा बंद करण्याची हि सुरवात तर नसेल? आपल्या राज्याचे अस्तित्व दाखवणारे राज्यमंडळ बंद करण्याचाच हा विचार असेल का? की राज्य सरकारला आपल्याच महाराष्ट्र राज्य मंडळावर शंका आहे?

हेमंत हरिदासजी भोंबे
तळेगाव (शामजी पंत)
आष्टी, जि. वर्धा.
8483847467

जे पुस्तके आजपर्यंत बालभारतीकडूनच तयार केले जातात, ज्यात प्रामुख्याने महाराष्ट्राची संस्कृती, शूर वीर महान योध्ये यांचे इतिहासातील शौर्य, थोर महान पुरुषांचे विचार, स्वतंत्र संग्रामाची स्वातंत्रासाठीची लढाई, ऐतिहासिक व्यक्तिरेखा, मराठी भाषेचे महत्व, संत-समाजसुधारकांची असलेली मोठी परंपरा, साहित्य, कला यातून प्रकटले विचार या सगळ्यांचे महत्व कमी करण्याचा हा अट्टाहास तर नाही ना? बालभारतीच्या पुस्तकांचा अवमान तर होणार नाही ना? आणि खरंच यामुळे राज्याची भाषा, इतिहास आणि संस्कृती याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता हि कधीच नाकारता येणार नाही.

इतकेच नाही तर आजही राज्यातील कितीतरी शाळा या प्रत्यक्षात जमिनीवर भरतात, तोकड्या भौतिक सोयीसुविधा, भारंभार उपक्रम, आणि अशैक्षणिक कामांच्या ओज्याखाली दबलेले शिक्षक, मुख्याध्यापक हेच अस्वस्थ करणारे विदारक चित्र आपल्या या मराठी शाळांचं असेल तर बोर्ड बदलले म्हणजे गुणवत्ता येईल का हो? हे गृहितक कोणत्या संशोधनावर आधारलेले आहे?

शिक्षणमंत्री आणि शासनाकडून सांगितले जात आहे त्याप्रमाणे जर स्थानिक इतिहास, भूगोल, संस्कृती, भाषा या बाबत स्थानिक संदर्भच वापरले जाणार आहेत तर मग आता आहे तो अभ्यासक्रम आणि व्यवस्था यात बदल करण्याचे नेमके कारण तरी काय?

सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये गुणवत्ता आहे या म्हणण्याला कोणत्या अभ्यासाचा आधार आहे, हेही समजायला मार्ग नाही. आणि जर सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये गुणवत्ता आहे असे तुम्हाला मानायचे असेल तर तर राज्यातील मराठी शाळांमध्ये गुणवत्ता नाही हाच त्याचा अर्थ असेल?

महत्वाचा मुद्दा हा आहे सर्व बोर्ड सारखे आहेत. गुणवत्ता ही शाळा, तिथली तत्त्वज्ञान, शिक्षक यांच्यावर अवलंबून असते. बोर्ड हा केवळ एक फ्रेमवर्क असतो, बोर्ड वरुन पाल्याची शैक्षणिक गुणवत्ता ठरत नसते. गुणवत्ता ठरत असते ती शाळेची फिलॉसॉफी आणि त्याशाळेतील शिक्षक यांच्या मेहनतीवर. पण राज्यातील शिक्षक खरंच तितकी मेहनत घेतात का हे सरकारने सगळ्यात आधी आवर्जून बघावे.

आज कितीतरी शिक्षक स्वतः त्यांना गल्लेलठ्ठ पगार असताना त्यांच्या स्वतःच्या मुलांना मात्र दुसऱ्या शाळेत म्हणजेच कॉन्व्हेंट आणि इंग्लिश शाळेमध्ये टाकतात जिथे योग्य समाधानकारक अर्हताप्राप्त शिक्षक भरती न करता केवळ बी.ए, बी.एस.सी. इत्यादी शिक्षण झालेले अप्रशिक्षित शिक्षक वर्गात उभे केले जातात ज्यांचा पगार हा फक्त १० ते १२ हजार असतो, त्यांना ना कोणते प्रशिक्षण आणि ना कोणता दर्जा, हे स्वतः एका खुद्द मंत्र्यांनी मान्य सुद्धा केलेले आहे.

मग याच शिक्षण वृंदांना स्वतःच्या अभियोग्यत्यावरच जर शंका असेल, स्वतःवर विश्वास भरोसा नसेल तर ते काय CBSC ची गुणवत्ता राज्यातील विद्यार्थ्यांना देईल, त्यांना कितीही प्रशिक्षण दिले तरीही सारखेच आणि म्हणूनच आज कितीतरी पालक वर्ग आपल्या मुलांना सरकारी शाळांमध्ये न पाठवता प्रायव्हेट शाळांमध्ये मध्ये मोठी मोठी फीस भरून पाठवत आहेत, आणि ही फार मोठी शोकांतिका आपल्या राज्यातील आहे. असे असताना सरकार मात्र यावर चूप आणि गप्प राहतात. जर आता याच शिक्षकांकडे जर पुन्हा नव्या अभ्यासक्रमाची जबाबदारी सोपवली गेली, तरीही ती प्रभावी अंमलबजावणी होईल का, हा प्रश्नच आहे.

शिक्षकांना नव्या अभ्यासक्रमाची सवय होण्यासाठी दजेर्दार प्रशिक्षणाची गरज तर भासेलच पण यासाठी स्वतः शिक्षक आणि शिक्षण विभाग हे तरी तयार आहेत का? आणि, ग्रामीण भागातील शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा नाही, स्वच्छतागृहे, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक हे सर्व केवळ कागदांपुरतेच मर्यादित आहेत, संसाधनांची कमतरता, शिक्षकांची कमतरता यासाठी सरकार काय प्रयत्न करणार आहेत? अशा अवस्थेत फक्त अभ्यासक्रम बदलून काही साध्य होईल का?

आणि आज सरकारी शाळांमध्ये गोर गरिबांचेच मुले शिकतात मग आपल्या पाल्याची क्षमता काय, तो काय शिकतो, तिथल्या शिक्षकांची अभियोग्यता हे त्या पाल्याला बरोबर कळते पन जर CBSE बोर्ड आलं तर पालकवर्ग विद्यार्थ्यांची क्षमता तपासू शकतो का? अक मशीन लर्निंग, डेटा सायन्ससारख्या विषयांमध्ये केवळ टर्म वापरून आधुनिक शिक्षण होत नाही. मूलभूत समज, विचार करण्याची सवय, आणि मूल्याधिष्ठित शिक्षण हे खरे शिक्षणाचे मापदंड असावेत.

खर तर, बोर्डपेक्षा बोर्डाचा जो अभ्यासक्रम आहे तो ज्ञानरचनावादाने विद्यार्थ्यांना शिकविला जातो का, की तो केवळ पाठांतरावर अवलंबून आहे? हे पाहणे तितकेच महत्वाचे आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचा सरकारचा उद्देश निश्चितच स्वागतार्ह आहे.

मात्र हा बदल करताना आपल्या राज्यातील विद्यमान शिक्षण व्यवस्थेचे मूल्यही समजून घेतले पाहिजे. CBSE अभ्यासक्रम ही सुधारणा असेलच, असे नाही; ती योग्य धोरण, भक्कम तयारी, आणि स्थानिक गरजांचा विचार करूनच यशस्वी होऊ शकते.

कोणतेही बोर्ड श्रेष्ठ नाही, कोणतेही माध्यम कमी नाही. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच असले पाहिजे. विद्यार्थ्यांना अनुभवातून शिक्षण मिळाले तर ते अधिक गुणवत्तापुर्ण होते. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील बदल करताना, राज्याच्या संस्कृतीची आणि भाषेची मुळे तुटणार नाहीत, याची दक्षता घेणेही तितकेच आवश्यक आहे.

■ ■ ■

# धर्मसंरक्षणाचा अमरदीप : भगवान परशुराम



भारतीय संस्कृतीत, जेव्हा जेव्हा अधर्माचा अतिरेक झाला, तेव्हा तेव्हा परमेश्वराने विविध स्वरूपात अवतार धारण करून धमार्ची स्थापना केली. या परंपरेत भगवान परशुराम यांचा अवतार विशिष्ट महत्त्वाचा आहे. ते विष्णूंचा सहावा अवतार मानले जातात, आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वात क्षात्रशक्ती व ब्रह्मतेज यांचा अद्वितीय संगम दिसतो.

**इतिहास व चरित्र**

भगवान परशुराम यांचा जन्म भृगुवंशी ब्राह्मण ऋषी जमदग्नी आणि माता रेणुका यांच्या पोटी झाला. त्यांच्या जन्माचे कारणच धरणीवर पसरलेल्या अन्यायाचा नाश व धर्मसंस्थापना होते. 'परशु' या त्यांच्या आयुधावरून त्यांना 'परशुराम' हे नाव मिळाले.

परशुराम यांच्या जीवनातील एक महत्त्वाची घटना म्हणजे त्यांनी अत्याचारी क्षत्रियांचा ५१ वेळा संहार केला. यामागचा हेतू सूड नव्हता, तर समाजात धर्म व न्यायाचे पुनःस्थापन करणे हा होता. त्यांच्या या कार्यातून शौर्य स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी नव्हे, तर समाजहितासाठी असले पाहिजे, हा मूलमंत्र प्रकट होतो.

परशुराम हे अखंड तपस्वी, पराक्रमी योद्धा आणि महान गुरू म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी भीष्म, द्रोणाचार्य आणि कर्ण यांसारख्या श्रेष्ठ योद्धयांना शिक्षण दिले. त्यांच्या आयुष्यातील तपश्चर्या, कठोर साधना आणि अखंड कर्तव्यनिष्ठा हे आजच्या समाजासाठी आदर्श आहेत.

निलेश देव
(प्रमुख, ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प)
9860122555

**परशुरामांचे कार्य आणि महत्त्व**

भगवान परशुरामांनी केवळ शस्त्रबळाने धर्मसंरक्षण केले नाही, तर ते शास्त्र व संस्कृतीचेही महान संवर्धक होते. त्यांनी अनेक शिक्षणसंस्था स्थापन केल्या, शस्त्रविद्या आणि धर्मशास्त्र यांचे शिक्षण दिले. ते भारतीय भूमीच्या नव्या सुरवातीचे शिल्पकार होते. त्यांच्या प्रेरणेतूनच पुढे अनेक धर्मवीर, राष्ट्ररक्षक व संत उदयाला आले.

परशुरामांनी समुद्राला मागे हटवून कोकण व केरळ प्रदेश निर्माण केल्याचा उल्लेख देखील पुराणांमध्ये आहे. म्हणूनच ते भूगोलशास्त्रात आणि कृषी संस्कृतीतही एक महान योगदान देणारे ऋषी मानले जातात.

**आधुनिक काळातील परशुरामांची प्रेरणा**

आज, जेव्हा समाजात अन्याय, भ्रष्टाचार, मूल्यऱ्हास आणि स्वार्थाने ग्रासलेली व्यवस्था दिसते, तेव्हा भगवान परशुराम यांची शिकवण अधिक प्रासंगिक ठरते. त्यांचे जीवन सांगते की, अन्यायाचा प्रतिकार करणे हीच खरी धर्मसेवा आहे. मात्र, हा प्रतिकारही संयम, विवेक आणि शास्त्रनिष्ठतेनेच व्हायला हवा. परशुराम हे केवळ शस्त्राचे प्रतीक नाहीत, तर शास्त्र आणि धर्मपरायणतेचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे धैयार्ने सत्यासाठी उभे राहणे, सदाचाराने समाजाला दिशा देणे आणि आध्यात्मिक साधनेने जीवन समृद्ध करणे.

**भगवान परशुराम जयंतीचे महत्त्व**

भगवान परशुराम जयंती हा केवळ एक सण नाही; ती आत्मपरिक्षणाची व आत्मोन्नतीची प्रेरणा आहे. या दिवशी आपण त्यांच्या जीवनातील आदर्शांचा ध्यास घेऊन समाजरक्षणासाठी व राष्ट्रनिमार्णासाठी आपले योगदान द्यावे, हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल.

परशुराम जयंतीच्या निमित्ताने आपण सर्वांनी संकल्प करूया. अन्यायाविरुद्ध संघर्ष करणे, धर्ममूल्यांचे जतन करणे, आणि निःस्वार्थ सेवेने समाजहितासाठी कार्यरत राहणे.शेवटी, भगवान परशुरामांचे स्मरण म्हणजे नवी चेतना, नवा उत्साह आणि नवा धर्मसंघर्ष यासाठी तयार राहण्याची प्रेरणा! ■ ■

### भगवान परशुराम
### ब्राह्मतेज आणि क्षात्रतेजाचा आदर्श!

वैशाख शुक्लपक्ष तृतीया म्हणजे अक्षय तृतीयेला भगवान परशुरामांचा जन्म झाला. ब्राम्हतेज आणि क्षात्रतेज यांचा उत्कृष्ट उपयोग करणारे श्रेष्ठतम योद्धयाचे उदाहरण म्हणजे भगवान परशुराम! ज्यांनी २१ वेळा संपूर्ण पृथ्वीला प्रदक्षिणा घालून क्षात्रतेजाच्या बळावर अहंकारी आणि अधर्मी क्षत्रियांचा नाश केला. तसेच कार्तवीर्य सारख्या अपराजेय परंतु अधर्मी राजाचा, ज्याने जमदग्नी ऋषीच्या आश्रमातून गोमातेचे बलपूर्वक अपहरण केले होते, त्याचा पराभव ब्राह्मतेजाच्या बळावर केला.

आजच्या काळात देखील भगवान परशुरामांच्या क्षात्रतेज आणि ब्राह्मतेज यांची अत्यंत आवश्यकता आहे. काळानुरूप ब्राह्मतेज म्हणजे काय? तर साधना करणे, धर्मशिक्षण घेणे आणि इतरांना देणे. तसेच क्षात्रतेज म्हणजे काय तर? अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संघटित होऊन सन्मार्गाने लढा देणे. ज्यामुळे समाजातील दुष्पवृत्ती, अनाचार यांचा नाश होऊ शकेल आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने भगवान परशुराम जयंती साजरी होईल.

■ रेणुका हरदास, नागपूर.

# जलस्त्रोतांचे संवर्धन काळाची गरज

**वाचक लिहितात**

महाराष्ट्रातील एक शक्ती पीठ म्हणजे अंबेजोगाई ची श्री योगेश्वरी देवी. ही अनेक जणांची कुलदेवता असल्याने भक्तांची येथे नेहमी गर्दी असते. मंदिर परिसर बऱ्यापैकी स्वछ आहे . मंदिराच्या जवळ एक नदी सदृश्य पाण्याचा प्रवाह आहे. १/१० टक्के पाणी व उरलेल्या भागात रसायनाचा कापसा प्रमाणे पांढरा फेस आहे. त्याच्या दुगंर्धीने जवळून जात असतांना जीव गुदमरतो. अंबेजोगाई सारख्या लहान गावातील नदीची ही अवस्था आहे. पुण्या, मुंबईसारख्या मोठ्या शहरातील नद्या सुद्धा गटार स्वरूपच झाल्या आहेत.

गंगा नदी सनातन धर्मात एक महत्वाची नदी आहे. कारण तिची झालेली उत्पत्ती. गंगे बरोबर यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधू, कावेरी ह्या नद्यांना देखील मानाचे स्थान आहे. कोणतेही कार्य करतांना कलशातील पाण्याला अभिमंत्रित करण्यासाठी ह्याच सप्त नद्यांचे स्मरण केले जाते व नंतर ते आपण तीर्थ भावाने ग्रहण करतो. दररोज स्नान करतांना आपण ह्याच नद्यांचा उल्लेख करतो.

वाढती लोकसंख्या,वाढते उद्योग, नदी वरील अतिक्रमण ह्या मुळे नदी अरुंद,उथळ प्रदुषित होत चालली आहे. नदीचा उगम पर्वता वर होतो. आपल्या प्रवाहा बरोबर ती अनेक खनिजे, वनस्पतींचे औषधी गुणधर्म घेऊन येते तसेच ती आपल्या बरोबर घाण कचरा वाहून नेते व परिसर स्वच्छ करते. जेथे स्वच्छता तेथे देवाचे वास्तव्य. सनातन धर्मात नदीला देवी स्वरूप मानले गेले आहे व तिची पूजा केली जाते. नदी म्हणजे पाण्याचा प्रवाह नाही तर जल ह्या पंचमहाभूताचा प्रवाह असतो.

नदी म्हणजे संस्कार , संस्कृती. आपल्याला जर स्वच्छ व भरपूर पाणी हवे असेल तर सर्व नद्यांचे प्रदूषण थांबणे अत्यंत गरजेचे आहे. सनातन धर्मात सांगितल्या प्रमाणे नदी, तलाव, सागर सर्व जल स्रोताचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

■ श्रीमती लीना गाडगीळ
पनवेल.

# उन्हाळ्यात उष्माघाताची समस्या जाणवते? या सोप्या ट्रिक्स करा फॉलो..



उन्हाळ्यात उष्माघाताच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ होते. जेव्हा एखाद्याला उष्माघात होतो तेव्हा त्याच्या शरीराचे तापमान वाढते. तीव्र डोकेदुखी, डोळ्यांतून पाणी येणे, मळमळ, उलट्या होणे, अस्वस्थता, गोंधळ, हृदयाचे ठोके वाढणे, जलद श्वास घेणे, चक्कर येणे आणि बेशुद्ध पडणे असे लक्षण दिसून येते.

ही लक्षणे दिसताच, बाधित व्यक्तीला आरामदायी तापमान असलेल्या मोकळ्या जागी बसवावे आणि ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधावा. उष्णतेवर मात करण्यासाठी, योग्य दिनचर्या पाळणे खूप महत्वाचे आहे. स्वतःच्या चुका, जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे केल्या गेल्या तरी, तुम्हाला उष्माघाताचा बळी बनवू शकतात. अशा परिस्थितीत काही छोट्या छोट्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

उष्णतेमुळे तुमच्या शरीरातील पाणी कमी होते ज्यामुळे उष्मघाताची समस्या होते. उष्माघात ही अशी स्थिती आहे जेव्हा शरीराचे तापमान नियंत्रित नसते, म्हणजेच शरीर स्वतःला थंड ठेवू शकत नाही. या परिस्थितीला हायपरथर्मिया असेही म्हणतात.

उष्माघात टाळण्यासाठी, शरीर हायड्रेटेड राहणे खूप महत्वाचे आहे. बरेच लोक कमी पाणी पितात, ज्यामुळे डिहायड्रेशन होते आणि उष्माघाताचा धोका वाढतो. उन्हाळ्यात, भरपूर पाणी पिण्यासोबतच, बेलचा रस, लिंबूपाणी, सत्तूचा रस, ताक, आंबा पन्ना, नारळ पाणी इत्यादी द्रवपदार्थांचे सेवन करावे. अल्कोहोलचे सेवन केल्याने शरीर डिहायड्रेट होते, ज्यामुळे उष्माघाताची शक्यता वाढते.

उन्हाळ्यात, कॅफिन म्हणजेच चहा आणि कॉफी कमी प्रमाणात सेवन करावे. उष्माघात टाळण्यासाठी दुपारी १२ ते दुपारी ३ वाजेपर्यंत घरातच राहावे.

बाहेर जात असाल तर तुमचे डोके हलक्या रंगाच्या सुती कापडाने झाकून ठेवा. अधूनमधून विश्रांती घ्या आणि सावलीत जा. इलेक्ट्रोलाइट पावडर सोबत ठेवा आणि ते पाण्यात मिसळून प्या. उन्हाळ्याच्या दिवसात खूप थंड पेये प्यायलात तर यामुळे उष्माघाताची शक्यता वाढते. त्यामुळे शक्यतो कोल्ड्रींक्स घेणे टाळा.

■ ■ ■

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**अक्षय**

प्रत्येक गोष्टीचा होतो
या भूतलावर क्षय
फक्त मानवी सत्कार्याची
कीर्तीच आहे अक्षय ...

अक्षय होणं भौ
एवढं सोपं नसते
अहं लोभ स्वार्थावर
पाणी सोडावं लागते . .

मी म्हणतो म्हणून
तू मानु नको खरे
बुद्ध गांधी विवेकानंदाचं
चरित्र वाचून पहा बरे ... !

## महत्त्वाचे

### ५१ जोडप्यांचा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा

**सिडको ।** शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीय, कर्जबाजारी शेतकरी, गरिब व अनाथ निराधार पाल्यांसाठी जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने भव्य सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा निःशुल्क आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा २० मे रोजी मंगळवार, सायंकाळी ६ वाजता, छत्रपती राजे संभाजी स्टेडियम, अश्विन नगर, सिडको येथे संपन्न होणार आहे. या विवाह सोहळ्यात एकूण ५१ जोडपी विवाहबद्ध होणार असून, विविध धर्मीय व सामाजिक स्तरातील वधू-वर या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. गरिब व वंचित घटकांच्या पाल्यांसाठी सामूहिक विवाहाचे आयोजन करून ट्रस्टने समाजातील एक महत्त्वाचा सामाजिक उपक्रम उचलला आहे. या सोहळ्याचे आयोजन जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापिका अध्यक्षा जयश्री चौधरी यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. विवाह सोहळ्याचा संपूर्ण खर्च ट्रस्टतर्फे उचलण्यात येणार असून, प्रत्येक नवविवाहित जोडप्याला आवश्यक ते सर्व साहित्य व आशीर्वाद देण्यात येणार आहेत. ट्रस्टच्या वतीने सर्व नाशिककरांना या मंगलप्रसंगी उपस्थित राहून वधू-वरांना शुभआशीर्वाद द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हा सोहळा समाजातील समतेचे आणि बंधुभावाचे प्रतीक ठरणार आहे.

### सुवर्णदुर्ग किल्ल्यावर प्राचीन खेळांचे अवशेष

**दापोली ।** प्राचीन पटखेळ संवर्धन मोहीम महाराष्ट्र राज्य अंतर्गत प्राचीन खेळांच्या दस्तऐवजीकरण, नोंदणीचे काम सुरु असून दि. १९ एप्रिल रोजीच्या भ्रमंतीमधून सोज्वळ साळी (मोहीम प्रमुख) व उमेश पंडित यांच्या निदर्शनास आले असून त्याचे दस्तऐवजीकरण करण्यात आले असून त्याची नोंद करण्यात आली आहे. कोणता खेळ सापडला? दक्षिण आफ्रिकेतील पारंपरिक खेळ म्हणून ओळखला जाणारा मंकला ज्याला दक्षिण भारतात पलंगुळी, अळीगुळीमाने या नावानेसुद्धा ओळखले जाते. या खेळाचे अवशेष भारतात मोठ्या प्रमाणात मिळाले असून सोज्वळ साळी यांना आजपावेतो १००० पेक्षा जास्त खेळ महाराष्ट्रात शोधण्यात यश प्राप्त झाले आहे. या खेळाचे अवशेष नासिक मधील त्रिरश्मी लेणी (पांडवलेणी), अंकाई लेणी, रतनगड, गोंदेश्वर, टाहाकारी देवी मंदिर, ऐरेश्वर मंदिर येथे मिळाले होते, त्यासोबतच पुणे, कोल्हापूर, मुंबई, सातारा, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पालघर, सांगली या जिल्ह्यात सापडले असून रत्नागिरीतील सुवर्णदुर्ग किल्ल्यात सापडले आहे.

### जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय १ मे पासून कार्यान्वित

**नाशिक ।** दिव्यांग कल्याण विभागाच्या 100 दिवसांचा कृती आराखडा या उपक्रमांतर्गत प्रादेशिक व जिल्हा स्तरावर कार्यालय सुरू करणे या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन आवारातील शासकीय अंधशाळेच्या इमारतीत जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय १ मे २०२५ पासून कार्यान्वित होणार असल्याची माहिती नाशिकचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी भरत चौधरी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. दिव्यांग कल्याण विभागाचे जिल्हा स्तरावरील कामकाज सद्यस्थितीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांच्यामार्फत हाताळण्यात येत आहे. जिल्हस्तरीय कार्यालय स्वतंत्रपणे सुरू करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागातील कार्यरत वैद्यकीय समाजिक कार्यकर्ता मगन चौधरी यांच्याकडे जिल्हा दिव्यांग अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत दिव्यांग शाळा संहिता, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना, नियम इत्यादी बाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्यामार्फत सद्यस्थितीत होणारी कामे करण्यासाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांना देण्यात आलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकारी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांना सोपविण्यात आले आहे, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### लाभार्थ्यांनी हयातीचे दाखले सादर करावेत

**नाशिक ।** संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांचे हयातीचे दाखले सादर करण्याचा कालावधी १ एप्रिल ते ३० जून २०२५ असा आहे. या योजनांच्या लाभार्थ्यांनी दरमहा योजनेचा लाभ डीबीटीद्वारे प्रदान होण्यासाठी विहीत मुदतीत हयातीचे दाखले सादर करावेत, असे आवाहन संजय गांधी योजना तहसीलदार उषाराणी देवगुणे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. हयात प्रमाणपत्र सादर करतांना यासोबत बँक पासबुक, रेशनकार्ड, दारिद्र्यरेषा प्रमाणपत्र, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र याच्या छायांकित प्रत, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी करिता रूपये २१ हजार उत्पन्नाचा दाखला, दिव्यांग लाभार्थी करिता रूपये ५० हजार उत्पन्नाचा दाखला, मतदान ओळखपत्र, मुलाचे वयाचे दाखले, दिव्यांग लाभार्थी यांनी मनपातून लाभ घेत नसल्याबाबत प्रमाणपत्र, लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत नसल्याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

# आदर्श संस्थाचालक पुरस्कार पिंपळगाव बसवंतच्या मंगलाताई जाधव यांना प्रदान



**पिंपळगाव बसवंत ।** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ जिल्हा शिवसेनेच्या वतीने दिला जाणारा शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श संस्थाचालक हा सन्मानाचा पुरस्कार पिंपळगाव बसवंत येथील निफाड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमन मंगलाताई जाधव यांना विशेष समारंभात नाशिक येथे खासदार भास्करराव भगरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी निफाड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव अरुण महाले, संचालक उद्धवराव निरगुडे, सोमनाथ मोरे, रामराव मोरे, बी. आर. पाटील, पंढरीनाथ संधान, समीर जाधव आदींसह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. शैक्षणिक क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार मिळाल्याबद्दल मंगलाताई जाधव यांचे आमदार दिलीपराव बनकर, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, माणिकराव बोरस्ते, शकुंतला वाघ, दिलीपराव मोरे, नानासाहेब बोरस्ते आदींनी अभिनंदन केले. मंगलाताई जाधव या दिवंगत माजी खासदार माधवराव जाधव यांच्या स्नूषा असून निफाड एज्युकेशन सोसायटीचे दिवंगत चेअरमन बाळासाहेब जाधव यांच्या पत्नी आहेत. स्व. माधवराव जाधव हे निफाड एज्युकेशन सोसायटीचे तब्बल 25 वर्ष चेअरमन होते, तर स्व. बाळासाहेब जाधव हे पाच वर्ष चेअरमन आणि २५ वर्षे संस्थेच्या विविध पदांवर कार्यरत होते. जाधव परिवाराच्या उत्तम कार्यपद्धतीमुळे निफाड एज्युकेशन संस्थेला मोठा नावलौकिक प्राप्त झाला आहे. दरम्यान निफाड एज्युकेशन सोसायटीच्या पिंपळगाव हायस्कूल मा. ल. जाधव कन्या विद्यालय पिंपळगाव, शेलु हायस्कूल, मुखेड हायस्कूल, चिंचखेड हायस्कूल, आयटीआय, बी. पी. पाटील ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स आदी शाखा असून हजारो विद्यार्थी या शैक्षणिक संकुलात शिक्षण घेत आहेत.

बी. पी. पाटील महाविद्यालयात नाशिक जिल्हा व जिल्ह्या बाहेरील विद्यार्थ्यांनी सुध्दा प्रवेश घेतला आहे. बी. पी. पाटील ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स येथील शैक्षणिक पध्दत, शिस्त, गुणवत्ता आणि शंभर टक्के निकालाची परंपरा यामुळेच निफाड एज्युकेशन सोसायटीचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात घेतले जाते. तसेच वसतिगृहाची सुविधा, भव्य मैदान, तज्ञ शिक्षक, मेस सुविधा, ग्रंथालय, प्रयोगशाळा आदी सुविधा येथे उपलब्ध असून अतिशय उत्तम प्रशासन असल्याने निफाड एज्युकेशन सोसायटीचा नावलौकिक आहे.

# समाजकार्य क्षेत्रात करिअरच्या संधी अधिक : अ‍ॅड. नितिन ठाकरे

## मविप्र समाजकार्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक, गुणगौरव सोहळा




**नाशिक ।** समाजकार्य क्षेत्र इतर क्षेत्रांपेक्षा वेगळे असून, या क्षेत्रात करिअरच्या संधी अधिक आहेत. आजघडीला वैद्यकीय क्षेत्राला समाजकार्याची खूप गरज आहे. रुग्णांसोबत काम करून त्यांना मानसिक व भावनिक मदत करणे, त्यांच्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समाजकार्यकर्त्यांनी समाजाभिमुख काम करावे, असे प्रतिपादन मविप्र समाजाचे सरचिटणीस आणि नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. नितीन ठाकरे यांनी केले.

मविप्र संचलित समाजकार्य महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव सोहळ्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. वर्षभरातील महाविद्यालयातील उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. याप्रसंगी व्यासपीठावर मविप्रचे संचालक अ‍ॅड. लक्ष्मण लांडगे, समाजकल्याण विभागीय उपआयुक्त माधव वाघ, आदिवासी विभाग अतिरिक्त आयुक्त संदीप गोलाईत, महिला व बालकल्याण विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन रोपाला पाणी देवून अनोख्या पद्धतीने करण्यात आले. तसेच महाविद्यालयांतर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रम अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. वर्षभरातील उपक्रमांचे व्हिडिओ स्वरुपात सादरीकरण करण्यात आले. सध्या उच्च पदावर कार्यरत असलेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी महिला व बालकल्याण विभागीय उपआयुक्त चंद्रशेखर पगारे, आदिवासी विभाग अतिरिक्त आयुक्त संदीप गोलाईत, समाजकल्याण विभागीय उपयुक्त माधव वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना स्वानुभव कथन केले. क्षेत्रकार्याचा अनुभव मांडून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. डॉ. प्रतिभा पगार यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. डॉ. सोनल बैरागी यांनी वार्षिक कार्यक्रम अहवाल सादर केला. डॉ. प्रतिमा पवार यांनी विजेत्या स्पर्धक आणि गुणवंतांच्या नावांची घोषणा केली. डॉ. घनशाम जगताप यांनी सूत्रसंचालन केले.

# पुरुष गटात नाशिक शहर संघ विजयी; महिला गटात सांगली संघ विजयी

## आठवी राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी स्पर्धा २०२४-२५




**नाशिक ।** टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र आणि नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य टेनिस क्रिकेट स्पर्धा आणि निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा म्हसरूळ येथील एम्. एम्. सी क्रीडांगण म्हसरूळ, नाशिक येथे पार पडली. या स्पर्धेत पुरुष विभागात एकूण ११ संघ सहभागी झाले होते. तर महिला गटात ४ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उदघाटन टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया व टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र सचिव सौ. मिनाक्षी गीरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्रचे उपाध्यक्षविलास गीरी टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र महिला अध्यक्षा कुमारी धनश्री गिरी तसेच मुंबई उपनगर जिल्हा सचिव संदीप पाटील, सांगली जिल्हा सचिव विजय बिराजदार, रायगड जिल्हा सचिव स्वप्नील, नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड आणि पंच मंडळ उपस्थित होते. सदर स्पर्धा प्रथम साखळी आणि नंतर बाद पद्धतीने पार पडली.

उपांत्य फेरीत नाशिक शहर संघाने नाशिक ग्रामीण संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उपांत्य फेरीत जालना जिल्हा संघानी हिंगोली जिल्हा संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. नाशिक शहर आणि जालना यांच्यात खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात नाशिक शहर संघाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करून जालना जिल्हा संघावर मोठा विजय मिळवत या स्पर्धेचे विजेतेपद प्राप्त केले.

महिला गटात सांगली जिल्हा संघाने रायगड जिल्हा संघाचा पराभव करून अंतिम विजेतेपद प्राप्त केले. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे जालना जिल्हा संघाचे अमोल माही याने अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये आपली छाप सोडली. तर नाशिक शहर संघाचा खेळाडू गणेश यानेही सुंदर खेळ केला. या खेळाडूंच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना या स्पर्धेचे उत्कृष्ट खेकडू म्हणून गौरवण्यात आले. महिला गटात साक्षी गणे हीने फलंदाजीमध्ये तर अमूल्या हीने गोलंदाजीमध्ये चांगली कामगिरी नोंदवली. यांनाही महिला गटामध्ये उत्कृष्ट खेलाडू म्हणून गौरवण्यात आले.

या स्पर्धेत विजय उमरे. लखन देशमुख, सोमा बिरादार, दर्शन थोरात, प्रथमेश नानजकर, महेंद्र देशमुख, मानस पाटील, धनश्री गिरी, साक्षी गणे, रूतुजा तोरडमल, रोहिणी सकटे, धनंजय लोखंडे, सुनील मोर्यो यांनी पंच म्हणून काम पार पाडले.

# कर्नल मच्छिंद्र शिरसाठ यांना विजेतेपद; लेफ्टनंट कर्नल माणिक त्रेहान उपविजयी

**नाशिक ।** मीनका रिव्हरडेल गोल्फ २०२५ या स्पर्धेचे आयोजन दिनांक २४ ते २७ एप्रिल दरम्यान करण्यात आले होते. आज या स्पर्धेचे यशस्वी सांगता झाली. दि २४ एप्रिल पासून वेगवेगळ्या गटात स्पर्धा खेळविल्या गेल्या. यामध्ये ज्युनियर गट, कॅडी गट आणि खुला गट या तीन गटांचा समावेश होता. आज २७ एप्रिल रोजी रिव्हरसाइड गोल्फ कोर्स निफाड, नाशिक येथे एका दिमाखदार सोहळ्यात पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

या संपूर्ण स्पर्धेचे मुख्य आकर्षण असलेल्या खुल्या गटांच्या स्पर्धा दिनांक २६ आणि २७ रोजी खेळविण्यात आल्या. यामध्ये मुख्यत्वे नाशिक मधील एअर फोर्स, आर्मी तथा स्कूल ऑफ आर्टीचे स्पर्धक, नाशिक मधील रिव्हरसाइड गोल्फ कोर्सचे सभासद आणि मुंबई, पुणे, औरंगाबाद असे एकूण ७१ स्पर्धक सहभागी झाले होते. एकूण 9 (नऊ) होलच्या या स्पर्धेत ७१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये कर्नल मच्छिंद्र शिरसाठ यांनी ही स्पर्धा जिंकली. तर द्वितीय स्थान लेफ्टनंट कर्नल माणिक त्रेहान यांनी प्राप्त केले. स्कूल ऑफ आर्टीचे कमांडट लेफ्टनंट जनरल एन एस सरना यांच्या हस्ते रिवरसाइड गोल्फ कोर्स निफाड, नासिक येथे पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. लेफ्टनंट जनरल एन एस सरना यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संयोजकांचे आभार मानले. नासिक मधील या रिव्हर साईड

## मीनका रिव्हरडेल गोल्फ कप २०२५




गोल्फ कोर्स मधून भविष्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण होतील आणि देशाचे नाव उज्वल करतील असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमात रिव्हर साईड रिसॉर्टचे उद्घाटन जी सी एस आणि एम ए आय नवी दिल्ली यांचे अध्यक्ष विंग कमांडर अरुण कुमार सिंग यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की नाशिकला गोल्फ या खेळाचा फार मोठा इतिहास आहे. या रिव्हर साईड गोल्फ कोर्समुळे हा इतिहास जागृत ठेवण्याचा प्रयत्न यातून होतो आहे. या रिसॉर्ट मुळे हे सेंटर गोल्फ पर्यटन होणार आहे. या प्रसंगी अर्पणा डेव्हलपर्सचे संचालक मानव अग्रवाल, बिझनेस डेव्हलपमेंटचे आनंद ताडगे याशिवाय वासन टोयोटाचे सेल्स मॅनेजर रवींद्र बैरागी, अजय पाटील, जयदीप कुदळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्पर्धेचे आयोजक आणि रिव्हर साईड गोल्फ कोर्सचे संचालक विंग कमांडर प्रदीप बागमार, सौ शितल बागमार यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

# बालविवाह रोखण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा : उपजिल्हाधिकारी

**नाशिक ।** अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर होणारे बालविवाह रोखण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून, दुर्गम भागात जनजागृती करावी, अशा सूचना उपजिल्हाधिकारी (प्रशासन) तुकाराम हुलवळे यांनी दिल्या.



महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक, युनिसेफ एस.बी.सी.३ यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या बालविवाह निर्मूलन प्रकल्प अंतर्गत बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दलाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृह येथे उपजिल्हाधिकारी श्री. हुलवळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. श्री. हुलवळे यांनी बालविवाहाचे प्रमाण अधिक असलेल्या गावांमध्ये सक्षम युवा शक्ती कार्यक्रमांतर्गत सक्षम दिवस राबविला जाणार असल्याचे सांगितले. बालविवाह मुक्त जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात आला असून, यामध्ये ग्रामपंचायत, महिला व बालविकास विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष या विभागांमार्फत आराखडा अंमलबजावणी सुरु असल्याचे सांगितले. बालविवाह जिल्हा मुक्त करण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजना आणि १२५ शाळेत घेण्यात आलेल्या विद्यार्थी व पालक सत्राबाबत यावेळी माहिती दिली. अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याअनुषंगाने सर्व यंत्रणांनी समन्वयाने गावागावात जनजागृती करावी. यात प्रामुख्याने पोलीस विभाग, ग्रामपंचायत विभाग, शिक्षण व आरोग्य विभाग तसेच महिला व बालविकास विभाग यांनी बाल कल्याण समितीच्या मदतीने गावात जनजागृती करावी तसेच सोशल मीडियाचा वापर करून जास्तीत जास्त IEC पोस्टर फिल्म यांची प्रचार, प्रसिद्धी करून जनजागृती करावी आणि अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर होणारे बालविवाह थांबवावे. दुर्गम तालुक्यातील सर्व संबंधित विभागांनी जनजागृती व १०९८ प्रचार प्रसिद्धी कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घ्यावेत आणि होणारे बालविवाह रोखण्यासाठी १०९८ या नंबर वर माहिती द्यावी. १०९८ या टोल फ्री नंबरवर माहिती दिल्यास संबंधित व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवले जाते. असे श्री. हुलवळे यांनी सांगितले. या बैठकीस विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्यने उपस्थित होते.




# ४४ कोटींहून अधिक लठ्ठपणाच्या विळख्यात?

जाणून घ्या
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

२०५० पर्यंत ४४ कोटींहून अधिक भारतीय लठ्ठपणाचे शिकार होऊ शकतात, अशी धक्कादायक माहिती एका अहवालातून उघड झाली असून यावर खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील चिंता व्यक्त केली आहे.



भारतीय नागरिकांमध्ये दिवसेंदिवस लठ्ठपणाची समस्या वाढत असल्यामुळे नागरिकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळेच २०५० पर्यंत ४४ कोटींहून अधिक भारतीय लठ्ठपणाचे शिकार होणार असल्याचा धोका गांभीर्याने घ्यायला हवा. प्रत्येकाने सक्रिय आणि निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा सल्ला मोदी यांनी दिला आहे.

**बदलत्या जीवनशैलीमुळे लठ्ठपणा**

खाण्यापिण्याच्या बदलत्या सवयी आणि बदलते जीवनमान यामुळे लठ्ठपणाची समस्या वाढत आहे. बदलती जीवनशैली शरीरासाठी घातक ठरत आहे. यातही युवा वर्ग अधिक प्रमाणात लठ्ठपणास बळी पडत आहे. लठ्ठपणामुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळते. त्यामुळे वेळीच काळजी घेणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम करणे शरीरासाठी अत्यंत गरजेचे असल्याची माहिती या अहवालात देण्यात आली आहे. स्वत: फिट राहिलात तर देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देता येईल, हे प्रत्येक नागरिकाने समजून घ्यायला हवे.

**विविध कारणांमुळे लठ्ठपणा**

आजच्या काळात वारंवार जंक फूडचे सेवन करणे, व्यायाम न करणे, सतत मोबाईलचा वापर, अपूर्ण झोप अशा सर्व गोष्टींमुळे स्थूलपणा तसेच शरीरातील चरबीचे प्रमाण वाढत आहे. थोडक्यात लठ्ठपणा ही भारतीयांमध्ये झपाट्याने वाढणारी समस्या बनत आहे. लठ्ठपणामुळे तुमचे व्यक्तिमत्व बिघडतेच; शिवाय अन्य त्रासही संभवतात. लठ्ठपणामुळे एखादी व्यक्ती फॅटी लिव्हर, मधुमेह, कोलेस्टेरॉल, हृदयविकार, उच्च रक्तदाब, पक्षाघात आणि कर्करोग यासारख्या घातक आजारांनाही बळी पडू शकते. मात्र जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या सवयी चांगल्या ठेवल्या तर तुम्ही या आजारांपासून तुम्ही दूर राहू शकता. लठ्ठपणाचा सामना करण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे आणि पोषकतत्वांनी समृद्ध आहार घेणे महत्त्वाचे आहे.

# मुलांनाही बद्धकोष्ठता सतावते

आईवडिलांबरोबरच हल्ली मुलांच्या जीवनशैलीत, त्यांच्या आहाराच्या सवयीत मोठ्या संख्येने बदल होत आहेत. आहाराच्या चुकीच्या सवयी, फायबरयुक्त अन्नाची कमतरता, पाणी कमी पिणे आणि नियमित शौचास न जाणे यामुळेही पाच वर्षांखालील मुलांनाही बद्धकोष्ठतेची समस्या सतावू लागली आहे.

बद्धकोष्ठता अस्वस्थता, वेदनादायक आणि त्रासदायक आजार असतो. त्यामुळे याचे वेळीच निदान आणि उपचार करणे गरजेचे आहे. बद्धकोष्ठता ही वैद्यकीय समस्या बदलती जीवनशैली आणि आहाराच्या चुकीच्या सवयींमुळे उद्भवते. या समस्येमुळे मलविसर्जनास संघर्ष करावा लागतो. प्रक्रिया केलेल्या अन्नाचे सेवन, आहारात फायबरची कमतरता किंवा पुरेसे पाणी न पिणाऱ्या मुलांमध्ये ही समस्या सर्रासपणे आढळून येते.

**बद्धकोष्ठतेची लक्षणे**

मानसिक ताण, योग्य वयात शौचालय प्रशिक्षण न मिळणे आणि वेदना किंवा भीतीमुळे शौचास टाळणे हेदेखील या स्थितीस कारणीभूत ठरू शकते. वेळीच उपचार केले नाहीत तर दीर्घकालीन बद्धकोष्ठतेमुळे गुदद्वारात भेग, पोटदुखी आणि भूक न लागणे यासारख्या गुंतागुंतीचा सामना करावा लागू शकतो. बद्धकोष्ठतेच्या लक्षणांमध्ये आठवड्यातून तीनपेक्षा कमी वेळा शौचास जाणे, कठीण किंवा वेदनादायक मल, पोट फुगणे आणि पोट रिकामे न झाल्याने चिडचिड होणे यांचा समावेश आहे. हे लक्षात घेता पालकांनी मुलांच्या मलविसर्जन सवयींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मूल मलविसर्जन करताना अस्वस्थ होत असेल, मलविसर्जन करताना वेदना होत असतील किंवा शौचास जाण्यास नकार देत असेल तर याकडे दुर्लक्ष करू नका.



पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त मुलांना समस्या

दहापैकी सहा मुलांना मलविसर्जन करताना अस्वस्थता, पोट फुगणे आणि मलविसर्जन करण्यास असमर्थता हा त्रास दिसून येतो. बद्धकोष्ठतेची समस्या पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त मुलांमध्ये आढळून येते. अर्थातच समस्या वाढू नये यासाठी पालकांनी काही नियम पाळावे. जसे की, मुलांच्या आहारात बदल करताना फळे, भाज्या आणि कडधान्यातून फायबरयुक्त आहाराचे सेवन वाढवण्याचा आग्रह धरावा. त्यांना पुरेसे पाणी पिण्यासाठी प्रोत्साहन द्यावे तसेच नियमित शौचालयाचा वापर करण्याच्या सवयींचे पालन करण्याचा सल्ला द्यावा. मलविसर्जन सुलभ करण्यासाठी काही मुलांना वैद्यकीय देखरेखीखाली खास औषधे दिली जातात. गरज असेल तर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

* पाणी भरपूर प्यावे.
* प्रोसेस्ड फूड्सचे सेवन कमी करणे.
* गहू, फळभाज्यांचे सेवन करावे
* टोमॅटो आणि कोथिंबीरीचा ज्यूस पिणे.
* पालकांनीही फायबरयुक्त आहाराचे सेवन करावे.
* दैनंदिन जीवनात शारीरिक हालचालींना प्रोत्साहन द्यावे.
* आतड्यांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी आवश्यक ते उपाय योजावे.

# पाण्याची पातळी राखण्यासाठी...

आरोग्य व्यवस्थापन
डॉ. तुषार गलांडे

तंदुरुस्त आणि निरोगी रहाण्यासाठी शरीराला पुरेशा प्रमाणात द्रव पदार्थ मिळणं गरजेचं असतं. उन्हाळ्यात तर याची गरज तीव्रतेने भासते. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाली तर थकवा, डोकेदुखी, पायात गोळे येणं अशा समस्या निर्माण होतात. पाणी कमी प्यायल्याने भविष्यात काही व्याधीही जडू शकतात. पण दिवसभरात सतत पाणी पित रहाणंही कंटाळवाणं वाटतं. बरेचदा पुरेसं पाणी प्यायलं जात नाही. मात्र काही भाज्या आणि फळं खाऊनही शरीरातलं पाण्याचं प्रमाण वाढवता येईल. पाण्याचं प्रमाण वाढवण्यासाठी काय खायला हवं याविषयी...

* कलिंगडात ९६ टक्के पाणी असतं. लालचुटुक, सुमधुर असं हे फळ उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर खाल्लं जातं. यात पाण्यासोबतच फायबर, मॅग्नेशियम आणि पोटॅशियमसारखी खनिजं तसंच क आणि अ ही जीवनसत्त्वं असतात. कलिंगडात अँटिऑक्सिडंट्सही असतात.
* पालकात ९२ टक्के पाणी असतं. जीवनसत्त्वं आणि खनिजांनी समृद्ध अशी ही भाजी आहे. पालकात उष्मांकही खूप कमी असतात. त्यामुळे पालकाचा आहारात समावेश करायला हवा.
* काकडीमध्ये ९५ टक्के पाणी असतं. तसंच यात पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि क जीवनसत्त्व असतं. त्यामुळे शरीराची पाण्याची गरज भागवण्यासाठी काकडीचंही नियमित सेवन करता येईल.



* टोमॅटोमध्ये भरपूर पाणी असतंच शिवाय हे पोषक घटकांची खाण आहे. यातले पोषक घटक अनेक व्याधी आपल्यापासून दूर ठेवतात. त्यामुळे शरीराला थंडावा आणि ओलावा देण्यासाठी टोमॅटो खाता येतील.
* संत्री, स्ट्रॉबेरी आणि टरबूज या फळांमध्येही भरपूर पाणी असतं. त्यामुळे ही फळं तुम्ही आवर्जून खायला हवी.

# मातामृत्यूची गंभीर समस्या

आरोग्यविशेष
डॉ. प्रसन्न नेने

संयुक्त राष्ट्र आणि जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये गर्भधारणा आणि बाळंतपणाशी संबंधित प्रकरणांमध्ये जवळजवळ प्रत्येक दोन मिनिटाला एक महिला मरते किंवा या कारणामुळे दररोज ७०० पेक्षा जास्त महिलांचा मृत्यू होतो, असे समोर आले आहे.

अहवालात असे दिसून आले आहे, की २००० ते २०२३ या कालावधीत जगभरातील मातामृत्यूच्या संख्येत ४० टक्क्यांनी घट झाली आहे. आधी प्रति १,००,०००



जिवंत जन्मांमागे मातामृत्यूची संख्या अधिक होती. मात्र २०१६ पासून सुधारणेचा वेग मंदावला असल्याचेही स्पष्ट झाले आहे. त्याचमुळेच एका अंदाजानुसार २०२३ मध्ये जगभरातील दोन लाख ६० हजार स्त्रिया गरोदरपणात किंवा बाळंतपणाच्या गुंतागुंतीमुळे मरण पावल्याचे समोर आले आहे. ९० टक्क्यांहून अधिक मातामृत्यू कमी वयाच्या मातांचे होतात.

**मातृत्वाच्या सुरक्षेचा अधिकार**

हा अहवाल सद्यस्थिती समोर आणणारा म्हणावा लागेल. आज वैद्यकशास्त्र प्रगत आहे. मातामृत्यू रोखण्यासाठी गर्भारपणात करावे असे अनेक उपचारपद्धती उपलब्ध आहेत. वेगवेगळ्या तपासण्यांमधून गर्भारपण मातेच्या जीवास त्रासदायक आहे की नाही, हे जाणून घेता येते. मात्र असे असूनही आज जगातील बहुतांश भागात गर्भधारणा धोकादायक ठरत आहे. उपलब्ध आकडेवारीवरुन ही बाबही स्पष्ट होते. त्यामुळे मातृत्वाचा आनंद घेऊ इच्छिणाऱ्या महिलांनी आपल्या सुरक्षेचे अधिक काळजी घ्यायला हवी. आपली सुरक्षाव्यवस्था बळकट करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी जाणून घ्यायला हवे.

**कोविडनंतर ४० हजार महिलांचा मृत्यू**

या अहवालात मातेच्या जीवनावर कोरोना साथीच्या आजाराच्या प्रभावाचे पहिले जागतिक अवलोकनदेखील सादर केले आहे. अंदाजानुसार, २०२१ मध्ये ४० हजारांहून अधिक महिलांचा गर्भधारणा किंवा बाळंतपणामुळे मृत्यू झाला. २०२० मध्ये ही संख्या दोन लाख ८२ हजार होती. पुढे ती तीन लाख २२ हजारांपर्यंत वाढली. अहवालात असे म्हटले आहे, की कोरोना संसर्गामुळे थेट गुंतागुंत होण्याव्यतिरिक्त हे मृत्यू मोठ्या प्रमाणात सेवांमधील व्यत्ययांमुळे देखील झाले.

**तातडीच्या सेवेची गरज**

या सर्व माहितीवरुन महामारी आणि इतर आपत्कालीन परिस्थितीत आरोग्यसेवा सुनिश्चित करण्याचे महत्त्व अधोरेखित होते. गर्भवती महिलांसाठी नियमित सेवा आणि तपासणी तसेच काळजी घेणे आवश्यक आहे, असे अहवालात म्हटले आहे. याची गांभीर्याने दखल घ्यायला हवी.

# बैठ्या कामाचे नकारात्मक परिणाम

जीवनशैली
डॉ. मेघा पठारे

ऑफिसमधील बैठे काम आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. संशोधनात कामाच्या दरम्यान ब्रेक घेण्यावरही भर देण्यात आला आहे. संशोधनानुसार, ऑफिस कर्मचाऱ्यांना जास्त वेळ बसून राहिल्याने मोठ्या आरोग्यहानीचा धोका असतो. सतत बसून काम करण्यामुळे आरोग्य बिघण्याची शक्यता ८० टक्के असू शकते, असेही हा अहवाल सांगतो.

बैठ्या जीवनशैलीमुळे टाईप २ मधुमेह, हृदयविकार आणि काही कर्करोगांपासून ते उच्च रक्तदाब आणि वाढत्या मृत्युदरापर्यंतचे महत्त्वपूर्ण आरोग्य धोके आहेत. कोरोनाच्या आजारापासून दूरस्थ कामगारांची संख्या वाढत आहे. ते त्यांच्या कार्यालयातील सहकाऱ्यांपेक्षा जास्तवेळ बसून काम करतात. ही वस्तुस्थिती अधिक चिंताजनक असल्याचे तज्ज्ञ सांगतात.



**ब्रेक घ्या**

दीर्घकाळ बसून राहिल्याने आरोग्यावर नकारात्मक परिणाम होण्याचा धोका वाढू शकतो. 'जर्नल ट्रान्सलेशनल बिहेवियरल मेडिसिन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात ब्रेक कधी आणि कसा घ्यावा याचा शोध घेण्यात आला आहे. त्यासाठी सहभागींना दोन स्वतंत्र गटांमध्ये विभागण्यात आले होते. त्यांना बसण्याची वेळ कमी करण्यासाठी पसंतीचा दिनक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. 'चॉईस' गटामध्ये सहभागी पर्यायांच्या सूचीमधून स्वतः रणनीती निवडू शकतात किंवा त्यांना नियुक्त केलेल्या तज्ज्ञांनी शिफारस केलेल्या रणनीती निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते. याउलट, 'कोणताही पर्याय नाही' या गटाला या प्रकरणात काहीही म्हणायचे नव्हते आणि त्यांना रणनीती निवडण्याचे किंवा तज्ज्ञांच्या शिफारसींचे पालन करण्याचे काम देण्यात आले होते.

**दीर्घकाळ बसून राहू नका**

चार आठवड्यांपर्यंत सहभागींनी बसून, उभे राहून आणि चालण्यात घालवलेला एकूण वेळ तसेच त्यांच्या विश्रांतीची वारंवारता आणि कालावधी यांचे निरीक्षण केले गेले. सहभागींना प्रत्येक ३० ते ४५ मिनिटांनी लहान ब्रेक घेण्यास प्रवृत्त करणे हा हेतू होता. प्रत्येक ब्रेक दोन ते तीन मिनिटे होता. अभ्यासाच्या निष्कर्षावरून दिसून आले, की दोन्ही गटांमधील सहभागींच्या 'ब्रेक फ्रिक्वेन्सी'मध्ये वाढ आणि अभ्यासादरम्यान एकूण बसण्याच्या वेळेत समान घट दर्शविली.

**सक्रिय नसणे आरोग्यासाठी धोकादायक :** उल्लेखनीय म्हणजे 'कोणताही पर्याय नाही' गट ज्यांनी त्यांच्या बसण्यापासून विश्रांतीची वारंवारताच वाढवली नाही तर विश्रांतीचा कालावधीदेखील वाढवला. हा परिणाम दर्शवितो, की लोक 'ब्रेकिंग स्ट्रॅटेजी'शी कसे जुळवून घेऊ शकतात आणि त्यांचा फायदा कसा घेऊ शकतात. अभ्यासात म्हटले आहे, की आरोग्यामध्ये लक्षणीय सुधारणा करण्यासाठी दीर्घ विश्रांतीची आवश्यकता नाही. त्याऐवजी उत्तम आरोग्य परिणामांना चालना देताना एक आदर्श संतुलन निर्माण करण्यासाठी लहान ब्रेकवर भर देणेही पुरेसे आहे.

# नेत्रविकाराची दखल घ्या

आरोग्यचर्चा
डॉ. अमोल उगले

सकाळी उठल्यावर तुम्ही सर्वात आधी काय करता? खिडकी उघडून निळे आकाश, हिरवीगार झाडे आणि झाडांवर बसलेले पक्षी पाहता. कॉफीचा मग घेऊन वर्तमानपत्र वाचता. थोडक्यात काय तर हे जग किती सुंदर आहे असे म्हणत याचे कौतुक करता. पण या जगातल्या अनेक लोकांची सकाळ यापेक्षा खूप वेगळी असते. त्यांची स्वप्ने स्पष्ट आणि उज्ज्वल असू शकतात; पण जागे होताच त्यांना जग अंधुक दिसते. हे लोक उठताच सर्वात आधी चष्मा शोधतात. मायोपिया हे यामागचे कारण आहे.

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये एक महत्त्वाचा अहवाल प्रकाशित झाला आहे. त्यानुसार २०५० पर्यंत जगातील अर्ध्याहून अधिक लोकांना अस्पष्ट दिसेल, त्यांना चष्मा लागेल. म्हणजेच जगातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोक मायोपियानेग्रस्त असतील.

**मायोपिया म्हणजे काय?**

मायोपिया म्हणजे जवळची दृष्टी. ही डोळ्यांची अशी स्थिती आहे, ज्यामध्ये अपवर्तन त्रुटीमुळे एखाद्या व्यक्तीला दूरच्या वस्तू अस्पष्ट दिसतात तर जवळच्या दृष्टीचा त्रास असणारे लोक चष्मा नसतानाही जवळच्या वस्तू स्पष्टपणे पाहू आणि वाचू शकतात.

मायोपिया असणाऱ्या लोकांना टीव्ही पाहणे, रस्त्यावरील साइन बोर्ड पाहणे किंवा गाडी चालवणे यात अडचण येते. एखाद्या लहान वा किशोरवयीन मुलाला मायोपिया असेल, तर त्याला शाळेत काळा किंवा हिरवा बोर्ड दिसण्यास त्रास होतो. त्याला इतर लक्षणेदेखील भेडसावू शकतात.

**तीस टक्के लोक त्रस्त**

सध्या जगातील ३० टक्के लोक मायोपियाने ग्रस्त आहेत. मायोपिया हा एक अतिशय सामान्य आजार आहे. 'इंटरनॅशनल मायोपिया इन्स्टिट्यूट'च्या मते, अंदाजे ४० टक्के अमेरिकन लोक मायोपियाने ग्रस्त आहेत, तर जगभरातील सुमारे ३० टक्के लोक मायोपियाने ग्रस्त आहेत. ही प्रकरणे सतत वाढली तर २०५० पर्यंत जगातील निम्म्या लोकसंख्येवर याचा परिणाम होईल. म्हणूनच मायोपियाला पुढील महामारी मानले जात आहे.

**कशी घ्याल काळजी?**

* मोबाईल फोन, लॅपटॉप किंवा टीव्ही स्क्रीनवरील वेळ मर्यादित करा.
* दर २० मिनिटांनी २० सेकंदांचा ब्रेक घ्या आणि २० फूट अंतरावरुन स्क्रीन पाहा.
* घराबाहेर जास्तीत जास्त वेळ उन्हाच्या ठिकाणी घालवण्याचा प्रयत्न करा.
* कॉम्प्युटरवर काम करताना किंवा पुस्तक वाचताना १२ इंच अंतर राखण्याचा प्रयत्न करा.
* डोळे नियमितपणे तपासा. आधीच मायोपिया असेल तर नेत्रतज्ज्ञांनी सांगितलेल्या सुधारात्मक लेन्स वापरा.
* सूर्यप्रकाशात असताना अल्ट्राव्हायोलेट (यूव्ही) किरणांपासून संरक्षण करण्याचा प्रयत्न करा.
* कॉम्प्युटरवर किंवा कोणत्याही मशीनवर काम करताना डोळ्यांवर ताण येत असेल तर नियमित ब्रेक घ्या.
* उच्च रक्तदाब आणि मधुमेह यासारख्या जीवनशैलीसंबंधी आजारांवर नियंत्रण ठेवा.
* फळे, भाज्या आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडयुक्त आहार घ्या.
* व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सीने समृद्ध असणारी फळे आणि भाज्या खा.
* धूम्रपान आणि मद्यपान यासारख्या व्यसनाधीन गोष्टींपासून दूर राहा.

नवसंशोधन

## हार्मोन्समुळे लागते भूक!

आपण दिवसभर कामात असतो. मात्र संध्याकाळी घरी गेल्यावर प्रचंड भूक लागते. अशा वेळी खाण्याचा मोह आवरू शकत नाही. संध्याकाळच्या वेळी हार्मोन्समध्ये होणाऱ्या बदलांमुळे भुकेची तीव्रता बरीच वाढलेली असते.




यामुळे आपलं अतिखाणं होतं. वेफर्स, भजी यासारखे आरोग्यासाठी हानिकारक असणारे पदार्थ या वेळी खाल्ले जातात. अलिकडेच संध्याकाळच्या वेळी अतिखाणं होण्यामागची कारणं जाणून घेण्यासाठी एक संशोधन करण्यात आलं. त्यातून हार्मोन्समधल्या बदलांमुळे संध्याकाळी अतिखाणं होत असल्याची बाब समोर आली आहे. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ ओबेसिटी' मध्ये हे संशोधन प्रकाशित झालं आहे.

दंतारोग्य

## दातांचा पिवळेपणा दूर केल्यानंतर...

पांढरेशुभ्र, मोत्यासारखे चमकणारे दात व्यक्तिमत्त्व खुलवतात. मात्र विविध कारणांमुळे दात पिवळे पडतात. दातांची चमक पुन्हा मिळवण्यासाठी काही उपचार केले जातात. मात्र याबाबत अनेक गैरसमज प्रचलित आहेत. दातांचा पिवळेपणा दूर करण्यासाठी उपचार



घेतल्यानंतर चहा-कॉफी घेता येत नाही, असं अनेकांना वाटतं. पण प्रत्यक्षात चहा, कॉफीसारखी पेयं काही दिवस टाळण्याचा सल्ला दिला जातो. उपचारांनंतर दातांमधली छिद्रं भरेपर्यंत डाग पडण्यास कारणीभूत ठरणारी पेयं तसंच खाद्यपदार्थांचं सेवन करायचं नसतं. त्यानंतर तुम्ही या पदार्थांचं सेवन करू शकता.

डोळ्यांचे आरोग्य

## कॉन्टॅक्ट लेन्स पाण्यात ठेवू नका

कॉन्टॅक्ट लेन्स काढल्यानंतर त्या सोल्यूशनमध्ये ठेवल्या जातात. मात्र एखाद्यावेळी तुमच्याकडचं सोल्यूशन संपलं तर



कॉन्टॅक्ट लेन्स पाण्यात ठेवण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. मात्र कॉन्टॅक्ट लेन्स पाण्यात ठेऊ नये. तसंच पोहायला जाताना लेन्स काढून ठेवाव्या. पाण्यातले सूक्ष्मजंतू या कॉन्टॅक्ट लेन्सवर वाढतात. अशा लेन्स घातल्यानंतर तुम्हाला नेत्रविकार होऊ शकतात. क्वचित प्रसंगी अंधत्वही येऊ शकतं. कॉन्टॅक्ट लेन्सचे मायोपिया, हायपर ऑट्रोपिया आणि ॲस्टिगमेटिझम तसेच बहु-फोकल लेन्स, रंगीत लेन्स असे प्रकार आहेत. रंगीत लेन्स हे डोळ्यांचा रंग बदलण्यासाठी वापले जातात.

आजीबाईचा बटवा

## गुणकारी तमालपत्र

तमालपत्र पदार्थाची चव वाढवतं. हे साधंसं वाटणारं तमालपत्र खूप गुणकारी आहे. तमालपत्रातले काही घटक कर्करोग तसंच हृदयाशी संबंधित विकारांना प्रतिबंध करू शकतात. पाय मुरगळल्यावर संबंधित भागावर तमालपत्राचा लेप लावल्यास आराम




मिळतो. तमालपत्राच्या काढ्यामुळे नसांना आलेली सूज कमी होते. तमालपत्र ही एक औषधी वनस्पती आहे. ती शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. हे किडनीच्या आरोग्यास मदत करते.

तमाल पत्र पाण्यात उकळून पिल्यास वजन कमी होण्यास मदत होते यामध्ये असणारे अँटीऑक्सिडंट घटक शरीराची प्रतिकारशक्ती वाढवतात.

# सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये किरकोळ वाढ

## रिलायन्सच्या शेअर्समध्ये दुसऱ्या दिवशीही तेजी





**सेन्सेक्स 80,288**

**निफ्टी 24,335**

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

अस्थिर व्यापार सत्रानंतर, आज, २९ एप्रिल रोजी सेन्सेक्स आणि निफ्टी किरकोळ वाढले. सेन्सेक्स ७० अंकांनी वधारला. निफ्टी ७ अंकांनी वधारला. सलग दुसऱ्या दिवशी दोन्ही प्रमुख निर्देशांक हिरव्या रंगात राहिले. बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजारमूल्य २००० कोटी रुपयांनी वाढले. आजच्या व्यवहारादरम्यान, आयटी आणि तेल आणि गॅस समभागांमध्ये सर्वात जास्त वाढ दिसून आली. दुसरीकडे, फार्मा, युटिलिटी आणि धातू समभागांमध्ये घसरण झाली. बीएसईचे स्मॉलकॅप आणि मिडकॅप निर्देशांकही किरकोळ वाढीसह हिरव्या रंगात राहिले.

दिवसाअंती, बीएसई सेन्सेक्स ७०.०१ अंकांनी किंवा ०.०९ टक्क्यांनी वधारून ८०,२८८.३८ वर बंद झाला. एनएसईचा ५० शेअर्सचा निर्देशांक निफ्टी ७.४५ अंकांनी किंवा ०.०३ टक्क्यांनी वधारून २४,३३५.९५ वर बंद झाला.

२९ एप्रिल रोजी बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४२६.१२ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील व्यापार दिवशी म्हणजेच सोमवार २८ एप्रिल रोजी ४२६.१० लाख कोटी रुपये होते. अशाप्रकारे, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज सुमारे २००० कोटी रुपयांनी वाढले आहे. म्हणजेच दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे २००० कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

बीएसई सेन्सेक्सच्या ३० पैकी १५ शेअर्स आज हिरव्या चिन्हावर म्हणजेच वाढीसह बंद झाले. यामध्ये, रिलायन्स इंडस्ट्रीज (आरआयएल) च्या शेअर्समध्ये सर्वाधिक २.२६ टक्के वाढ दिसून आली. त्यानंतर, टेक महिंद्रा, इटरनल, इंडसइंड बँक आणि एचसीएल टेकचे शेअर्स १.२६ टक्के ते २.१४ टक्के वाढीसह बंद झाले.

त्याच वेळी, सेन्सेक्सचे उर्वरित १५ शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. यामध्येही अल्ट्राटेक सिमेंटचा शेअर सर्वाधिक २.३९ टक्क्यांनी घसरला. दुसरीकडे, सन फार्मा, पॉवर ग्रिड, एनटीपीसी आणि कोटक महिंद्रा बँकेच्या शेअरमध्ये १.११ टक्क्यांवरून १.९९ टक्क्यांनी घसरण झाली. बँकिंग शेअर्समध्ये आज कमकुवतपणा दिसून आला. एचडीएफसी बँकेच्या शेअर्समध्ये आज १९२८.८० रुपयांच्या पातळीपासून विक्रीचा दबाव दिसून आला. शेवटी, हा निर्देशांकातील हेवीवेट शेअर १९०६ रुपयांच्या पातळीवर बंद झाला.जर आपण निफ्टी ५० च्या टॉप लॉसर्सकडे पाहिले तर अल्ट्राटेक सिमेंट, कोल इंडिया, ओएनजीसी, सन फार्मा, जेएसडब्ल्यू स्टील सारख्या काउंटरचा समावेश होता.आज निफ्टीमध्ये वरच्या पातळीपासून दबाव दिसून आला, परंतु त्याने २४३०० च्या पातळीला मजबूत आधार पातळी म्हणून वापरले आणि दिवसाच्या शेवटी, निफ्टी २४३३५ च्या पातळीवर थोड्याशा वाढीसह बंद झाला.

# पाकिस्तानची उडाली घाबरगुंडी...

# भारताच्या हवाई हल्ल्याच्या भीतीने सियालकोट तळावर रडार यंत्रणा तैनात

**नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्याला आज सात दिवस झाले. या घटनेवर भारताकडून कडक सैन्य कारवाई होण्याच्या भीतीने पाकिस्तानचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे पाकिस्तानी लष्कराकडून भारताच्या कोणत्याही कारवाईपासून वाचण्यासाठी तयारी केली जात आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, भारताच्या एअरस्ट्राईकला डिटेक्ट करण्यासाठी पाकिस्तानी सैन्याने आपल्या रडार सिस्टीमला सियालकोट सेक्टरमध्ये तैनात केले आहे.

फिरोजपूरला लागुन असलेल्या परिसरात भारताच्या सैन्य हालचालींची माहिती मिळविण्यासाठी पाकिस्तानी सैन्याने इलेक्ट्रॉनिक वॉरफेअरला अग्रभागी तैनात केले आहे. अलिकडेच, पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय सीमेपासून फक्त ५८ किमी अंतरावर असलेल्या चोर कॅन्टोन्मेंटमध्ये TPS-७७ रडार तैनात केले होते.

दरम्यान, पाकिस्तानने सलग पाचव्या दिवशी युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि नियंत्रण रेषेवर गोळीबार केला. पाकिस्तानी सैन्याने कुपवाडा, बारामुल्ला आणि अखनूर सेक्टरमध्ये गोळीबार केला. याला भारतीय लष्कराने जशास तसे उत्तर दिले आहे.

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये निष्पाप २६ लोकांचा मृत्यू झाला होता. तर १७ हून



अधिकजण जखमी झाले होते. या घटनेत दहशतवाद्यांनी लोकांना टीपून लक्ष्य बनवले होते.

पहलगाम हल्ल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा मंत्रिमंडळ समितीने (CCS) सिंधू पाणी करार तात्काळ प्रभावाने स्थगित केला. भारताने पहिल्यांदाच इतकी मोठी आणि कठोर कारवाई केली आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये तीन मोठी युद्धे झाली आहेत परंतु हा करार यापूर्वी कधीही स्थगित करण्यात आला नव्हता.

कॅबिनेट समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांबाबत, परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी केले होते. ज्यामध्ये म्हटले होते की, १९६० चा सिंधू पाणी करार तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. पाकिस्तान सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत ही बंदी कायम राहील.

# 'देवाभाऊ' चष्मा फक्त 33 रुपयांत जागतिक शिखर परिषदेत जाणार




**बदलापूर,दि.२९ प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामातून प्रेरणा घेत त्यांच्या नावाने सर्वात स्वस्त, टिकाऊ आणि उपयुक्त असा चष्मा काढला आहे.

किमान ३३ रुपयांपासून ते २६० रुपयांपर्यंतच्या या चष्म्यांमुळे जगात क्रांती घडेल; असा विश्वास साकिब गोरे यांनी व्यक्त केला. तसेच आमदार किसन कथोरे यांच्या सहकार्यातून त्यांनी आतापर्यंत १७०० गावांमधून २६ लाख लोकांची मोफत नेत्र तपासणी केली आहे. तसेच १७ लाख चष्म्यांचही वाटप करण्यात आले आहे. अंधत्व निवारण मोहिमेत गेली ३४ वर्ष समाजकार्य करणारे बदलापुरमधील साकीब गोरे नेहमी अग्रेसर असतात. त्यांना दृष्टी दानातून अनेक गोरगरिबांचे आशीर्वाद लाभले आहेत. यांनी आता जागतिक क्रांतीच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यांनी आपल्या व्हिजन फ्रेंड साकिब गोरे या संस्थेच्या माध्यमातून अवघ्या ३३ रुपयात चष्मा बनवला आहे. इतकेच नाही तर नेपाळच्या काठमांडूत होणाऱ्या जागतिक शिखर परिषदेत 'देवाभाऊ' नावाने हा चष्मा ठेवला जाणार आहे. अर्थात निवड झाल्यास १४० देशात हा ३३ रुपयांचा चष्मा बदलापूरमधून जाणार आहे.


# अभिनेता रोहित बासफोरचा मृतदेह धबधब्याजवळ मिळाला, हत्या झाल्याचा कुटुंबीयांचा आरोप

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

प्राईम व्हिडिओची लोकप्रिय वेब सीरीज 'द फॅमिली मॅन' सीजन ३ फेम अभिनेता रोहित बासफोरचे निधन झाले आहे. तो आसामचा राहणारा होता. नुकताच तो आपल्या गावी गेला होता. त्याचा मृतदेह आसाममधील एका धबधब्याजवळ आढळल्याची माहिती समोर आलीय. दरम्यान, त्याच्या कुटुंबीयांनी मित्रांकडून त्याची हत्या झाल्याचा आरोप केला आहे.

'द फॅमिली मॅन' सीझन ३ मध्ये रोहित बासफोरने दमदार भूमिका साकारली होती. ही प्राईम व्हिडिओची प्रसिद्ध वेब सीरीज होती.

रविवारी सायंकाळी तो मित्रांसमवेत आसाममधील गर्भंगा जंगलात फिरायला गेला होता. त्यानंतर त्याचा मृतदेह मिळाला. त्याच्या कुटुंबीयांनी हत्येचा आरोप केला आहे. तसेच त्याच्या शरीरावर



जखमांचे निशाण मिळाले आहेत. आता पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, दिवस संपल्यानंतरही रोहित बासफोरचा संपर्क न झाल्याने त्याच्या कुटुंबीयांना चिंता लागून राहिली होती. त्यानंतर त्याचा शोध सुरु झाला. त्याच्या एका मित्राने त्यांना या दुर्घटनेची माहिती दिली. पुढे कुटुंबीयांना तो जंगलात सापडला. त्याला रुग्णालयात नेण्यात आले. तिथे डॉक्टर्सनी त्याला मृत घोषित केलं.

पोलिसांच्या माहितीनुसार, गुवाहाटी मेडिकल कॉलेज रुग्णालयात केलेल्या शवविच्छेदनामध्ये त्याच्या शरीरावर अनेक जखमांचे निशाण असल्याचे उघड झाले. डोके, चेहरा, अन्य भागांवर जखमा आहेत.

रोहितच्या कुटुंबीयांनी ही हत्या असल्याचे म्हटले आहे. मीडिया रिपोर्टनुसार, रोहितच्या कुटुंबीयांचा दावा आहे की, अलिकडेच रोहितचा पार्किंगवरून वाद झाला होता. या वादात तिघे जण होते. शिवाय एक जिम मालकदेखील असल्याचे म्हटले. यानेच रोहितला ट्रिपसाठी बोलावलं होतं. पोलिसांच्या माहितीनुसार, हे चौघे जण सध्या फरार आहेत.

# करेगुट्टाच्या चकमकीत तीन महिला नक्षलींना कंठस्नान

**गडचिरोली, दि. २९ प्रतिनिधी**

छत्तीसगड आणि तेलंगणा राज्याच्या सीमावर्ती भागातील नक्षल्यांचे अतिसुरक्षित ठिकाण म्हणून ओळख असलेल्या करेगुट्टा पहाडाला दोन्ही राज्यांच्या सुमारे १० हजारांहून अधिक जवानांनी मागील सहा दिवसांपासून वेढा घातला आहे. तेथे झालेल्या चकमकीत आतापर्यंत तीन नक्षली महिलांना कंठस्नान घालण्यात पोलिसांना यश आले असून, त्यांचे मृतदेह पोलिसांच्या हाती लागले आहेत. मृत नक्षल्यांचा आकडा २० हून अधिक असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाराष्ट्रातील नक्षल प्रभावित गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील सशस्त्र नक्षली जवळपास संपले आहेत. तेलंगणामध्येही मोजके नक्षली शिल्लक असून, त्यांच्या कारवाया बऱ्याच दिवसांपासून थंडावल्या आहेत. मात्र, छत्तीसगड राज्य हे सर्वाधिक नक्षल प्रभावित राज्य असून, तेथील सुकमा,




दंतेवाडा व बिजापूर या तीन जिल्ह्यांमध्ये नक्षली कारवाया मोठ्या प्रमाणावर होत असतात. त्यामुळे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च २०२६ अखेर छत्तीसगडमधील नक्षल्यांचा समूळ नाश करणार असल्याचा अनेकदा पुनरुच्चार केला आहे.

अभियानावर असलेल्या जवानांना कडक उन्हात पायपीट करावी लागत असल्याने त्यांना प्रचंड त्रास होत आहे. आतापर्यंत ५० हून अधिक जवानांना उष्माघात झाल्याने त्यांना तेलंगणा राज्यातील भद्राचलम व अन्य ठिकाणी उपचारासाठी नेण्यात आले. प्रकृती बिघडल्यास जवानांची दुसरी तुकडी तयार ठेवण्यात आली आहे.

# पाढे पाठ असलेला प्रणीत

शाळेत असताना गणित विषयाचा अभ्यास आणि त्यातही पाढे पाठ करायचं म्हणलं की, अनेकांसाठी ते सर्वात कंटाळवान काम असतं. मात्र औरंगाबादच्या एका चिमुकल्याने तर त्यातही विक्रम केला आहे. अवघ्या पाच वर्षाच्या वयात पठ्ठ्याने एका मिनिटात सात पर्यंत पाढे म्हणत, नव्या विक्रमाची नोंद केली आहे. सर्वत्र त्याच्या वर कौतुकाचा वर्षाव होताना दिसत आहे. या चिमुकल्याचं नाव प्रणित बाहेती असून, त्याच्या गुणाची नोंद वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये करण्यात आली आहे. सध्याच्या युगात नवे नवे विक्रम नोंदवले जातात. यामध्ये कोणी उड्या मारण्यात, तर कोणी धावण्यात अशा प्रकारांमध्ये विक्रमांची नोंद करत असते. काही वर्षात तेच रेकॉर्ड पुन्हा मोडले जातात आणि नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केले जातात. असाच एक आगळावेगळा विश्वविक्रम औरंगाबादच्या प्रणित बाहेती यांनी केला आहे. वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये त्याच्या कलेची नोंद घेण्यात आली आहे. कमी वेळेत कोण जास्तीत जास्त पाढे म्हणू शकतो, याबाबत आगळीवेगळी स्पर्धा होती. यात स्पर्धेत



800 हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात प्रणित हा सर्वात लहान वयाचा स्पर्धक होता. याने एका मिनिटात सात पर्यंत न अडखळता पाढे म्हणून दाखवले. त्याच्या या कलेची नोंद घेत, नवा विक्रम म्हणून घोषित करण्यात आले. तो जगातील सर्वात कमी वयात एका मिनिटात सर्वाधिक पाढे म्हणणारा विक्रमवीर म्हणून घोषित करण्यात


**मुलखावेगळी माणसं**

आला. त्याचे वडील ॲड. अक्षय बाहेती यांना मेल द्वारे त्याबाबत माहिती देण्यात आली आणि प्रमाणपत्रही पाठवण्यात आलं.

पाच वर्षाचा प्रणित प्री - प्रायमरी शाळेत शिकतो. त्याची आजी घरात शिकवणी घेण्याचं काम करते. त्यावेळेस मुलांकडून रोज पाढ्यांची उजळणी घेतली जात असते. रोज कानावर पडणारे पाढे प्रणितच्या स्मरणात बसले, तोही हळूहळू त्या सरावात सहभागी होऊ लागला. त्यावेळी कुटुंबीयांना तो पाढे म्हणू शकतो याबाबत खात्री पटली. कुटुंबीयांनी त्याला आणखीन पाडे शिकवायला सुरुवात केली. पाच वर्षाचा हा चिमुकला दहापर्यंत पाढे म्हणू शकतो. आजीमुळे मला पाढे म्हणता येतात, असा हा चिमुकला आत्मविश्वासाने सांगतो.प्रणित याचे वडील ॲड. अक्षय बाहेती यांनी त्याचा कलागुणांकडे बघून अशा पद्धतीचे विक्रम नोंदवले गेले आहेत का? याबाबत तपासणी केली. त्यावेळी ऑनलाइन पद्धतीने मिळालेल्या माहितीनुसार अशा कुठलाही विक्रम कोणीही केलेला नव्हता. त्यांनी प्रणितचे काही व्हिडिओ आणि माहिती वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्डला पाठवली. त्यांनी ती पडताळणी आणि त्यानंतर झालेल्या स्पर्धेत 800 हून अधिक मुलांनी सहभाग नोंदवला. मात्र त्यात एका मिनिटात सात पर्यंत पाढे म्हणणारा प्रणित एकमेव ठरला, न चुकता स्पष्टपणे उच्चार करत त्याने पाढे म्हणल्याने, त्याची विश्वविक्रमात नोंद घेण्यात आली, अशी माहिती प्रणितचे वडील ॲड. अक्षय बाहेती यांनी दिली.

**लोकमानस**

# नवीन रेंज रोव्हर इव्होक ऑटोबायोग्राफीचे भारतात पदार्पण



नवीन आणि अपग्रेडेड रेंज रोव्हर इव्होक ऑटोबायोग्राफी भारतात लाँच करण्यात आली आहे. त्याच्या धाडसी भूमिकेसह, परिष्कृत तपशीलांसह आणि आयकॉनिक रेंज रोव्हर डिझाइन डीएनएसह, रेंज रोव्हर इव्होक स्वतःला खऱ्या अर्थाने मूळ म्हणून ओळखत आहे. आता अधिक करिष्माई आणि अत्याधुनिक उपस्थिती असलेले, नवीनतम रेंज रोव्हर इव्होक प्रगत तंत्रज्ञान आणि प्रीमियम मटेरियलसह कमी करणारे डिझाइन तत्त्वे एकत्रित करते, आजच्या आधुनिक लक्झरी ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या आवडींना पूर्ण करते.नवीन रेंज रोव्हर इव्होक ऑटोबायोग्राफी दोन पॉवरट्रेन पर्यायांसह उपलब्ध आहे - P250 पेट्रोल माइल्ड हायब्रिड इंजिन जे 184 kW पॉवर आणि 365 Nm टॉर्क देते आणि D200 डिझेल माइल्ड हायब्रिड इंजिन जे 150 kW पॉवर आणि 430 Nm टॉर्क देते. जेएलआर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक राजन अंबा म्हणाले: "आमची ऑटोबायोग्राफी ट्रिम ही रेंज रोव्हरवर उपलब्ध असलेल्या उच्च-स्तरीय लक्झरी ट्रिमपैकी एक आहे ज्यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण पर्याय आहेत. ही ट्रिम परिष्कार आणि लक्झरीची स्पष्ट अभिव्यक्ती आहे. रेंज रोव्हर इव्होकवर ही अपवादात्मक ऑफर सादर करण्यास आम्हाला उत्सुकता आहे, ही एक कॉम्पॅक्ट लक्झरी एसयूव्ही आहे जी कोणत्याही तडजोडशिवाय तयार केली गेली आहे. रेंज रोव्हर इव्होकमध्ये पहिल्यांदाच, ही ट्रिम आलिशान सुएडेक्लोथ हेडलाइनिंग, स्लाइडिंग पॅनोरॅमिक रूफ, फुल एक्सटेंडेड लेदर अपग्रेड, पिक्सेल एलईडी हेडलाइट्स आणि बरेच काही यासारखी वैशिष्ट्ये आणते, ज्यामुळे वाहनाचा लक्झरी भाग आणि डिझाइन नवीन उंचीवर पोहोचते.''

**चलती का नाम गाडी**

# अंधश्रद्धा हा समाजाला लागलेला शाप आहे का?

**वाद संवाद**

**१] नचिकेत गोखले**
**[ प्राध्यापक ]**

समाजातील अंधश्रद्धा हा आपल्या समाजाला लागेलला शाप आहे हे विधान अगदी सत्य आहे. अगदी प्राचीन युगापासून मानवाने देव नावाची काल्पनिक संकल्पना जन्मास घातली आणि आपल्या संस्कृतीने याच तथाकथित संकल्पनेच्या अनुषंगाने मग देवाला गृहीत धरून असंख्य अंधश्रद्धा निर्माण केल्या. आपण आज कितीही उच्चशिक्षित असलो आणि डिजिटल युगात,विज्ञान युगात वावरत असलो तरी जनमानसात आजही असांख्य अंधश्रद्धा या दिसतातच. त्यातूनच अनेकदा पशूंचे आणि माणसांचे बळी देखील घेतले जातात हे अत्यंत पाशवी आणि भयानक आहे. यासाठीच समाजातील अंधश्रद्धांचे उच्चाटन जर समूळ करायचे असेल तर मुळात देवाला रिटायर्ड करणं हेच उत्तम.

**२] विद्या कांबळे**
**[समाजसेविका ]**

आपल्या भारतीय लोकशाही प्रणालीत राज्य घटनेनें समाजातील सर्व घटकांचा आदर करत प्रत्येकाला श्रद्धेनुसार देवपूजेचा हक्क दिलेला असला तरी आपल्याकडे याच श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धेचे पेव फुटलेले आहे हे अगदी सत्य आहे. अनेक उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित लोक देखील केवळ अपत्य प्राप्ती याकरिता अशा प्रकारे अंधश्रद्ध बनून प्रसंगी एखाद्या स्त्रीला स्वतःहून ढोंगी बाबा बुवांच्या जाळ्यात ढकलतात आणि नंतर बलात्काराच्या घटना घडतात. देवाला सोडले जाणारे जोगते,वाघ्या मुरली,देवदासी अशा किती तरी अघोरी प्रथा याच अंधश्रद्धेमुळे आपल्या समजत रुजलेल्या आहेत हे दुर्दैवी आहे. म्हणूनच देवावर श्रद्धा असावी मात्र या श्रद्धेच्या नावाने अंधश्रद्धेचा भरलेला बाजार मात्र निंदनीय आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# सावकारी मोडून काढा : आबिटकर

**कोल्हापूर, दि. २९ प्रतिनिधी**


सावकारांच्या छळामुळे सामान्य माणसाला जिवंतपणी मरण सहन करावे लागत आहेत. सर्वसामान्य माणसांचे जगणे मुश्कील झाले असल्याने यातून त्यांची सुटका करण्यासाठी सावकारीचा बंदोबस्त करा, अशा सूचना पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. ते सहकार दरबार कार्यक्रमात बोलत होते. जिल्ह्यातील सहकारी चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी सहकार दरबारमधून पाठबळ मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्र्यांच्या कल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महाराणी ताराबाई सभागृहात सोमवारी सहकार दरबार भरविण्यात आला होता. याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

सहकारातील अडचणी वेळेत सुटल्यास सहकारी संस्था अधिक कार्यक्षम बनतील. सभासदांचा विश्वास निर्माण होईल. नवीन सहकारी संस्था स्थापन होण्यास चालना मिळेल. सहकार चळवळ ही सामूहिक नेतृत्व व समाजघटकांच्या एकात्मतेचे प्रतीक आहे, असेही आबिटकर म्हणाले. विभागीय सहनिबंधक डॉ. महेश कदम यांनी स्वागत केले व प्रास्ताविकामध्ये सहकार दरबारचा उद्देश स्पष्ट केला.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, प्रभारी जिल्हा पोलिस प्रमुख नितेश खाटमोड-पाटील, प्रादेशिक साखर सहसंचालक गोपाळ मावळे, जिल्हा उपनिबंधक निळकंठ करे, जिल्हा लेखा विशेष कार्यालयातील किरण पाटील आदी उपस्थित होते. सहपालकमंत्री माधुरी मिसाळ यांनीही याठिकाणी भेट दिली. विभागीय सह निबंधक कार्यालयातील अधीक्षक मिलिंद ओतारी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त राज्यातील पहिला सहकार दरबार कोल्हापुरात भरविण्यात आला होता. या उपक्रमाचे अनुकरण करत अन्य जिल्ह्यातीलही हा उपक्रम सुरू करावा, अशी अपेक्षाही आबिटकर यांनी व्यक्त केली.

# 'आप' नेत्याच्या मुलीचा कॅनडात समुद्रकिनाऱ्याजवळ संशयास्पद मृत्यू



**ओटावा, दि. २९ वृत्तसंस्था**

कॅनडाच्या ओटावा शहरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारतीय वंशाची विद्यार्थिनी वंशिका हिचा संशयास्पद मृत्यू झाला असून वंशिकाचा मृतदेह ओटावातील एका समुद्रकिनाऱ्याजवळ संशयास्पद स्थितीत आढळून आला आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेचा ओटावा पोलिसांनी तपास सुरू केला असल्याची माहिती सांगितली जात आहे.

आम आदमी पक्षाचे आमदार कुलजीत सिंह रंधावा यांचे जवळचे सहकारी तथा 'आप'चे नेते दविंदर सैनी यांची वंशिका मुलगी होती. वंशिका ही मूळ पंजाबची रहिवाशी आहे. तसेच अडीच वर्षांपूर्वी वंशिका ओटावा या ठिकाणी शिक्षणासाठी गेली होती. मात्र, २५ एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी वंशिका घरातून बाहेर पडली आणि पुन्हा परत आलीच नाही. त्यानंतर तिचा फोनही बंद झाला आणि पुन्हा संपर्क झाला नाही.

वंशिका सैनी हिचा मृतदेह ओटावा येथील एका समुद्रकिनाऱ्याजवळ आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. दविंदर सैनी यांना २५ एप्रिल रोजी मुलगी वंशिका ही बेपत्ता झाल्याची माहिती मिळाली होती. वंशिकाच्या एका मैत्रिणीने तिच्या कुटुंबाला या संदर्भात माहिती दिली होती. त्यानंतर वंशिकाच्या कुटुंबाने तेथील स्थानिक पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर ओटावा येथील दूतावासाशी ऑनलाइन संपर्क साधल्यानंतर वंशिका बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवण्यात आल्याचं एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं.

दरम्यान, वंशिका सैनी हिच्या मृतदेहाचा शवविच्छेदन अहवाल समोर आल्यानंतर तिच्या मृत्यूचं कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. वंशिकाचे तिच्या कुटुंबाबरोबर २२ एप्रिल रोजी फोनवर शेवटचं बोलणं झालं होतं. दरम्यान, आमदार कुलजीत सिंह रंधावा यांनी या घटनेसंदर्भात म्हटलं की, "वंशिकाच्या मृत्यूने आम्हाला खूप दुःख झालं. ती डेरा बस्सी येथील तिच्या शाळेत टॉपर होती आणि आता कॅनडामध्ये शिक्षण घेत होती. दविंदर हे माझे जवळचे सहकारी आहेत आणि माझ्या कार्यालयाचे प्रभारी आहे. आमच्यासाठी ही घटना खूप धक्कादायक आहे."

# काश्मीरमधील ५० पर्यटन स्थळे पर्यटकांसाठी बंद

**श्रीनगर, दि .२९ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण देशभरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. यानंतर भारताने २३ एप्रिल रोजी काही महत्वाचे निर्णय घेत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश दिले. एवढंच नाही तर सिंधू पाणी करारही स्थगित केला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला असल्याचं पाहायला मिळत आहे.

दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आता जम्मू-काश्मीर सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. पर्यटकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव काश्मीर खोऱ्यातील संवेदनशील भागातील तब्बल ५० पर्यटन स्थळे पर्यटकांसाठी बंद करण्यात आले आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती सांगण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

पहलगाम येथे गेल्या आठवड्यात पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये महाराष्ट्रातील देखील ६ पर्यटकांचा मृत्यू झाला. ही घटना घडल्यानंतर पर्यटकांच्या सुरक्षेच्या संदर्भाने आणि खबरदारीचा उपाय म्हणून जम्मू आणि काश्मीर सरकारने काश्मीर खोऱ्यातील जवळपास ५० पर्यटन स्थळे आणि ट्रेकिंग ट्रेल्स बंद करण्याचा निर्णय आज घेतला आहे.

दरम्यान, बंद करण्यात आलेल्या ५० पर्यटन स्थळांमध्ये आणि ट्रेकिंग ट्रेल्समध्ये गुरेझ व्हॅली, दूधपथरी, वेरीनाग, बंगस व्हॅली आणि युसमार्ग सारख्या प्रसिद्ध पर्यटन स्थळांचा समावेश आहे. या संदर्भात एका अधिकाऱ्याने माहिती देताना सांगितलं की, "पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २५ पर्यटक आणि एका स्थानिक नागरिकाचा मृत्यू झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर सरकारने पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी ही पर्यटन स्थळे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच ज्या ठिकाणी पुरेशी सुरक्षा व्यवस्था आहे, असे पर्यटन स्थळे खुली आहेत."

तसेच बंद करण्यात आलेल्या पर्यटनाच्या ठिकाणांपैकी एक असलेले गुरेझ हे बांदीपोरा जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवरील एक दरी आहे. हे ठिकाणी देखील पर्यटकांमध्ये खूप लोकप्रिय मानलं जातं. तसेच दूधपथरी, कुपवाडा येथील बंगस व्हॅली आणि अनंतनाग येथील वेरीनाग, शोपियां येथील उंचावरील कौसरनाग तलाव, कौसरनाग हे ठिकाणही पर्यटकांसाठी बंद करण्यात आले आहेत. या बरोबरच उरी येथील कमान चौकी हे ठिकाण देखील बंद करण्यात आले आहे. या बरोबरच श्रीनगर शहरात मध्यभागी असलेल्या जामिया मशिदीला भेट देण्याची परवानगी देखील न देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

# 'अल्लाह हू अकबर' म्हणणारा व्यक्ती एनआयएच्या रडारवर

**श्रीनगर, दि. २९ वृत्तसंस्था**

काश्मीर खोऱ्यातील पहलगामपासून जवळच असलेल्या बैसरन पठारावर दहशतवाद्यांनी पर्यटकांच्या हत्या केल्या. २२ एप्रिल रोजी दुपारी ही घटना घडली. या घटनेचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. एक व्हिडीओ आता नव्याने समोर आला असून, त्यात गोळीबाराचा आवाज येत आहे. तर झिप लाईन ऑपरेटर अल्लाह हू अकबर म्हणत आहे. आता या ऑपरेटरला एनआयएने चौकशीसाठी समन्स बजावले आहे. झिपलाईनवर असताना ऋषी भट या पर्यटकाने हा व्हिडीओ शूट केला होता. यात झिप लाईन ऑपरेटर गोळीबाराचा आवाज एकून अल्लाह हू अकबर म्हणत असल्याचे एकायला येत आहे. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर या प्रकरणाचा तपास करत असलेल्या एनआयएने संबंधित व्यक्तीलाही समन्स बजावले आहे.



त्याचीही या प्रकरणात चौकशी केली जाणार आहे. हा व्हिडीओ शूट करणाऱ्या भट यांनीच झिप लाईन ऑपरेटरवर संशय असून, त्याची चौकशी केली जायला पाहिजे, अशी मागणी केली होती. गोळीबार झाला, त्यावेळी बैसरन पठारावर असलेल्या ऋषी भट यांनी सांगितले की, आम्हाला दहशतवादी हल्ल्याबद्दल कोणतीही कल्पना नव्हती. मी आनंदात तो व्हिडीओ बनवत होतो. पण, नंतर अचानक गोळीबाराचा आवाज आला. गोळीबार जवळपास अडीच वाजता झाला होता.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com